**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :०२**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :०७ /१०/२०१५

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती **सभा क्र -०२ बुधवार दि. १४ / १० /२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृहात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये.

**बुधवार दिनांक- १४ /१० /२०१५ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| १३ | मा.स्थायी समिती सभा क्र.१ मंगळवार दिनांक २६/०५/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे |
| १४ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल ) तसेच पंपचालक व विजतंत्री यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १५ | अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती नुसार प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १६ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री,पंपचालक व जोडारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट |

| | |
|---|---|
| १७ | कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना फिरता दवाखाना व रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, परिचारीका व लॅब टेक्निशियन यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्यात्तर मंजूरी मिळणे बाबत. |
| १८ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक या पदावर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता दरमहा मानधन वाढवून दरमहा मानधनावर करारबध्द पुर्निनियुक्ती करणे करीता मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १९ | इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबत. |
| २० | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री,जोडारी या पदांचे  दरमहा मानधन वाढविणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट. |
| २१ | अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) यापदी नंदकिशोर विठठल जाधव यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| २२ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी,लॅब टेक्निशियन,स्टाफ नर्स यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| २३ | अर्जदार सौ.अनुपमा मोहन गोसावी रा.प्लॉट नं.१४,श्रीराम नगरी,सागर कॉम्पलेक्स पुढे,आगरकर मळा,अ.नगर  सावेडी  प्रभाग समिती क्र.४ ,वॉर्ड क्रमांक २३, बील क्रमांक ५२९,दोन नळ कनेक्शन  ची पाणीपटटी आकरणी झालेली असून प्रत्यक्ष पहाणी केल्या नुसार एक नळ कनेक्शन असल्याने  सन २००३-२००४ पासून सन २०१५ अखेर ची पाणीपट्टी ची रक्कम रूपये २१२९२/- निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २४ | अर्जदार सचिव जयभिम सहकारी भाडेकारी गृहनिर्माण संस्था मर्या. रा. स्टेशन रोड यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२४ बील क्र.३५०, मोकळया प्लॉटची घरपटटी रक्कम निर्लेखित करण्यास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २५ | शिकाउ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाउ उमेदवारांचे विद्यावेतनात  झालेल्या वाढीबाबत भारत राजपत्रामध्ये नमुद असल्याने अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेमध्ये प्रशिक्षण घेणा-या शिकाउ उमेदवारांचे सुधारीत विद्यावेतनात सुधारणा करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| २६ | श्री.वसंत कान्होजी मेघडंबर,पा.पु.बिगारी यांना महाराष्ट्र  महानगरपालिका अधिनियम (सुधारीत ) २०१२ चे कलम ५६ (१) (ड) प्रमाणे  म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| २७ | अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचा सिध्दीबाग जलतरण तलाव ५(पाच) वर्षासाठी भाडे तत्वावर चालविण्यास देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| २८ | अर्जानुसार ॲड.श्री. धर्यशील लक्ष्मण वाडेकर , पॅनलशिपवरील कायदेशिर सल्लगार (मानद विधी तज्ञ) यांचा राजीनामा मंजुर करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र. नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १] विषय क्रमांक- १३ - मा.स्थायी समिती सभा क्र.१ मंगळवार दिनांक २६/०५/२०१५ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत

२] विषय क्रमांक- १४ ते २८ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०२**

विषय क्रमांक- १३ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०१ मंगळवार दिनांक २६/०५/२०१५ मा. स्थायी समिती रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर :-** मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ०१ मंगळवार दिनांक २६/५/२०१५ मा. स्थायी समिती रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.श्री. दिप चव्हाण :- या अगोदर सभा कधी झाली. मा.स्थायी समितीचे विषयाबाबत कोणी कोणी पत्र दिले.कोणते विषय होते. मागचे विषय कायम करणे म्हणजे विषय कुठे गेले. आयुक्तांकडे गेले का ? किती विषय खाली गेले ते सांगा.

प्र.नगसचिव श्री. साबळे :- यापूर्वी जे आयुक्तांकडे विषय गेले त्याची माहिती घेवून सादर करतो.

मा.श्री. दिप चव्हाण :- वृत्तपत्रात बातमी आली मा.आयुक्तांनी मागील सभेचे विषय मागवून घेतले,स्थायी समिती सभा घेणेबाबत किती सदस्यांनी पत्र दिले, हे विषय कोणाकडून आले,सभापतीकडून आले का ? अतिरिक्त आयुक्त यांनी सभेस उपस्थित राहीले पाहीजे, व हेच विषय सभेत कसे आले ?

प्र.नगरसचिव श्री. साबळे :- यापूर्वी मा.आयुक्तांकडे जे विषय गेले. त्याबाबत माहिती घेवून सादर करतो.

मा.श्री.दिप चव्हाण :- किती विषयाची मुदत संपली आहे, सभेचे नियम सांगा, सभा कोणी बोलविली

प्र.नगरसचिव श्री. साबळे :- प्र. नगरसचिव यांच्या स्वाक्षरीने मिटींग बोलविली आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- असे मागे किती विषय आयुक्त साहेबांकडे पाठविले. माहिती द्या. आयुक्त साहेबांनी नगरसचिव यांना निलंबित करणेबाबत नोटीस दिली होती. कर्मचा-यांचे संदर्भात महत्वाचे विषय होते का , ते तुम्ही मागविलेले विषय महत्वाचे होते. कर्मचा-यांची आवश्यकता असलेले विषयांची डिम परमिशन का घेतली नाही. सभापतीच्या व्यतिरिक्त सभा बोलावता येत नाही का ? नगरसचिवने दिनांक २६/५/२०१५ नंतर सभा का बोलवली नाही.

मा.सभापती साहेब :- मा. सदस्यांना महत्वाचे विषय सांगून सभा बोलावली पाहिजे होती.

मा.श्री.सचिन जाधव :- मा. आयुक्त साहेबांकडे आम्ही गेलो होतो. त्यावेळी त्यांनी ४५ दिवसानंतर कायदयाने आयुक्तांना अधिकार असलेबाबतआम्हाला माहिती दिली.

मा.श्री.दिप चव्हाण :- ७ महिने झाले असे किती विषय पडलेले होते. त्याची मुदत संपली मग त्याबाबत काय ?

प्र.नगरसचिव श्री.साबळे :- एकूण ३५ विषय मा. आयुक्त साहेबांकडे पाठविले ते वाचुन दाखवितो.

मा.श्री.दिप चव्हाण :- २०१३ नंतर किती चेअरमन झाले.पहिल्या विषयाची मुदत ४५ दिवसाची केव्हा संपली. मग आताच कसे पाठविले? त्यावेळी जर विषय घेतले नसेल तर तुम्ही डिम परमीशन का घेतली नाही.?

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- नगरसचिव विभागाने त्यावर कार्यवाही करायला पाहिजे. निवडणूक आचारसंहिता इ. कारणामुळे सभा होवू शकल्या नाहीत.

मा.श्री.दिप चव्हाण :- आयुक्त साहेबांना कळविले का? मुदत संपली बाबत पत्राने कळविले का ? कायदयाचा किस काढला नाही. सभेचे नियम आहेत. प्रकरण २ आम्हाला माहिती आहे.

मा.सभापती साहेबः- जे विषय मा.आयुक्तांनी घेतले ते सर्व विषय इथे घेवून ठराव करा.२०१३ मध्ये ४५ दिवस कधीच संपले.

प्र.नगरसचिव श्री. साबळे :- विषय क्रमांक १ ते ३५ ची यादी वाचून दाखवितो.

| | | |
|---|---|---|
| १ | सरपंच , ग्रामपंचायत कार्यालय, विळद यांचे पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या UIDSSMT योजने अंतर्गत अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ योजने अंतर्गत विळद ते नागापूर दरम्यान ६०० एम.एम.व्यासाची डी.आय.उर्ध्वनालिका टाकणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. | २९/१०/२०१३ |
| २ | अहमदनगर महानगरपालिकेचे मनपा शाळा क्रमांक- १४ मधील पहिल्या मजल्यावरील एक हॉल ३(तीन)वर्षे भाडे कराराने दरमहा भाडे व अनामत रक्कम घेउन अर्जदार अध्यक्ष/सेक्रेटरी- दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संस्थेकरीता, नवीपेठ ,अ.नगर यांना भाडेतत्वावर देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. | १६/१०/२०१४ |
| ३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या वतीने पॅनलशिपवर कायदेशिर सल्लागार (विधी तज्ञ) ॲडव्हेकेट म्हणून मा.ॲड.मंगला राजेश कोठारी यांना अटक झाले बाबत व तद्नंतर त्यांना जामीन झाल्याने त्यांनी दिनांक ३१/१०/२०१४ पासून कामकाजास सुरूवात केल्याबाबतचा ऑफिस रिपोर्ट . | १३/१/२०१५ |
| ४ | महाराष्ट्र शासन मुख्य अभियंता (विद्युत),मुंबई यांचे पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये नगरोत्थान योजनेंतर्गत अहमदनगर शहरात झालेल्या पथदिव्यांच्या कामाची चौकशी व तपासणी करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. | १२/२/२०१५ |
| ५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१३-२०१४ चा वार्षिक मुख्य लेखा परिक्षक यांचा लेखा परिक्षण अहवाल व सन २०१४-२०१५ चा मुख्य लेखा परिक्षक यांचा लेखा परीक्षण अहवालाबाबत. | १९/५/२०१५ |
| ६ | अहमदनगर महानगरपालिकेस बांधकाम साहित्य पुरवठा सन २०१५-१६चे वार्षीक निविदा दर मंजूर होईपर्यत सध्या सन२०१४-१५ करिता प्राप्त झालेल्या निविदा दरास मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. | २०/५/२०१५ |
| ७ | अर्जदार सौ.अंजली रमेश शेकळे, रा. बोल्हेगांव,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६७ बील क्रमांक १३०५ वर समायोजित करण्यास व बिल क्र. १०४३ , ओपन प्लॉट नोंद बील निर्लेखित करण्यास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | २१/५/२०१५ |
| ८ | अर्जदार सरोजिनी विनायक भोसले, रा. बोल्हेगांव,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६७ बील क्र.६६०/१ वर समायोजित करण्यास व बिल क्र.६६४,ओपन प्लॉटची बील रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | २१/५/२०१५ |
| ९ | अर्जदार श्री. जालिंदर पुंडलिक रोडे, रा. एम आय डी सी शाळेजवळ बोल्हेंगाव,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६७ बील क्र.१३७३ वर समायोजित करण्यास व बिल क्र. ११५९,ओपन प्लॉटची बील रक्कम निर्लेखित करण्यास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | २१/५/२०१५ |
| १० | अर्जदार श्री. प्रकाश दत्तात्रय मनवेलीकर व ७ इतर आणि ४ ओपन स्पेस मनपा , रा. बोल्हेगांव, गांधीनगर,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.६५व ६६ बील क्र.२७९,३७९,३८०, ३९५,३६३, ४७३, ५०४,८६६,९३८,९४०,९८५,१०३० ,ओपन स्पेसवर कर आकारणी रक्कम निर्लेखित करण्यास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | २१/५/२०१५ |

| | | |
|---|---|---|
| ११ | अर्जदार श्री. भानुदास वाघुले, रा. एकनाथनगर केडगाव,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.४१ बील क्र.४१७, पाणीपटटी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | २२/५/२०१५ |
| १२ | अर्जदार श्री. सौ. पुष्पावती निवृत्ती पाचपुते, खरे- राजेंद्र शांतीलाल गुंदेचा, रा. माणिकनगर चाणक्य रोड ,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२१ बील क्र.४८२, पाणीपटटी रक्कम+शास्ती निर्लेखित करण्यास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | २६/५/२०१५ |
| १३ | अहमदनगर महानगरपालिकेचे अधिकारी /पदाधिकारी यांच्या कार्यालयीन कामकाजासाठी वाहने भाडयाने लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट. | २९/५/२०१५ |
| १४ | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांवरील प्रथम वार्षिक पुनर्विलोकन अहवाल सन २०११-२०१२ बाबतचा ऑफिस रिपोर्ट. | २९/५/२०१५ |
| १५ | अहमदनगर महानगरपालिकेचे श्री. नायराण बाबुराव मिसाळ यांची स्पर्धा परिक्षा केंद्र संचालक या पदावर कंत्राटी करारानुसार अटी व शर्ती प्रमाणे मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट | २/६/२०१५ |
| १६ | अर्जदार श्री. बालक मोहन गीरी, रा. सचिननगर केडगाव,अ.नगर यांना नळ कनेक्शन नसतांना प्रभाग समिती क्र.४ ,वॉर्ड क्रमांक ३६, बील क्रमांक १५२१, पाणीपट्टीची रक्कम निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. | ९/६/२०१५ |
| १७ | अहमदनगर महानगरपालिकेचे रस्ता बाजू वसूलीचे टेंडर रद्द करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट. | १०/६/२०१५ |

प्र.नगरसचिव श्री. साबळे यांनी वाचन केले.

मा.श्री. दिप चव्हाण :- आजचे विषय का नाही घेतले सगळे. घ्यायला पाहिजे होते.

प्र.नगरसचिव श्री.साबळेः- विषय क्रमांक ३० मागासक्षेत्र विकास निधी तुलनात्मक तक्ता प्राप्त दिनांक १/८/२०१५

मा.सभापती साहेब :- आतापर्यत जे विषय वाचले त्यापैकी अधिकारी हजर नाही.

मा.श्री.दिप चव्हाणः- बांधकाम विभागाकडील अधिकारी उपस्थित नाही.शहर अभियंत्याकडे अतिरिक्त चार्ज आहे.

प्र.नगरसचिव श्री.साबळेः-विषय क्र.३३ नागरी दलीत वस्ती निविदा दराचा तुलनात्मक तक्ता प्राप्त दि.१/८/२०१५

मा.श्री.दिप चव्हाण :- आजच्या सभेवरचे विषय आयुक्त साहेबांकडे पाठवा.

३५ विषयाला मंजूरी केव्हा मिळाली.

प्र.नगरसचिव श्री. साबळे :- पहावे लागेल.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- खात्री करू. आयुक्त साहेबांनी मंजुरी दिली की नाही.

मा.श्री. दिप चव्हाण :- निधी किती आला ?

प्र.नगरसचिव श्री. साबळे :- विषय क्र.३४ वाचन दिनांक १६/९/२०१५ रोजी नगरसचिव विभागाकडे पुन्हा प्राप्त झाला. विषय क्र.३५ वाचन दिनांक १४/९/२०१५ प्राप्त होता.

मा.सभापती साहेब :- यावर का निर्णय घेतला नाही.

मा.श्री. दिप चव्हाण :- मा.स्थायी समितीची गांभीर्यता नसेल तर चर्चा कशी करणार.

मा.सभापती साहेब :- सभापती नाही हे तुम्हाला माहिती आहे. सदस्यां पैकी एक सभापती निवडून सभा घेवू शकता सदस्यांना याबाबत माहिती दयायला पाहिजे होती. तुम्ही सभा ५ महिने बोलविली नाही काय कायदेशीर तरतुद आहे. सभापती नाही हे तुम्हाला कसे कळाले तुम्ही अजेंडा सभापतीकडे पाठविला होते का हे विषय घ्यायचे आहेत. मग तुम्हाला परस्पर कसे कळाले हे विषय परस्पर कसे पाठविले.

प्र.नगरसचिव श्री. साबळे :- प्रकरण २ स्थायी समिती कामकाज तरतूद वाचून दाखवितो.

प्रकरण २ मधील ३(ई ) चे वाचन केले.

मा.श्री.दिप चव्हाण :- मा. सदस्यांनी मागणी केल्यानुसार सभा बोलावले येते. सभेच्या कामकाजाबाबत सभा बोलावणे नगरसचिवांचे काम आहे. त्यांनी त्यांचे अधिकार वापरले नाही. कोणी त्यांना सांगितले विषय पाठवा. अगोदर त्यांना तोंडी सांगितले नंतर नगरसचिव यांना कारणे दाखवा नोटीस बजावली असे सांगता. नोटीस वाचुन दाखवा.नोटीस सामान्य प्रशासन विभाग,आस्थापना विभागाकडून गेलेली नाही. आमची चेष्टा तर करत नाही.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- प्र.नगरसचिव यांना खुलासा मागविण्यात आला होता. मा. आयुक्त साहेब यांनी मंजुरी दिली किंवा नाही ही लेखी माहिती दोन दिवसात देवू. प्र.नगरसचिव यांचेकडे प्र.नगरसचिव पदाचा प्रभारी चार्ज आहे.

मा.दिप चव्हाण :- आम्हाला फक्त हा विषय कायदेशीर की बेकायदेशीर एवढे सांगा.

मा.उपायुक्त(सा.)श्री. चारठाणकर :- मा.आयुक्त साहेबांनी मंजुरी ३(के) अन्वये दिली आहे. ३ (के) चे वाचन केले.

मा.सभापती साहेब :- त्यावेळेस आमचेकडे कोणते विषय पाठविलेले.

मा.श्री. दिप चव्हाण :- टेंडर होते म्हणून मंजुरी दिली.

नगरसचिवाने सभा का बोलविले नाही हे आमचे म्हणणे आहे. आमचा एकच मुद्दा आहे आम्ही जर बेकायदेशीर मंजुरी दिली असती तर ३(के) लागू झाला असता. सभापती गैरहजर राहिला तर एक सदस्य सभापती म्हणून निवडू शकता अशी कायदेशीर तरतूद आहे.

श्री.निंबाळकर इंजि. :- मा. स्थायी समितीकडून मुदतीत सभा न झाल्याने मा.आयुक्त साहेबांनी मंजुरी दिलेले विषय / प्रस्ताव केले. एकूण ४ प्रकरणे पाठविले.

१. इंदिरानगर ड्रेनेज लाईन दि.३१/७/२०१५ ला पाठविला मंजूर दि.२४/९/१५ ल केला एजन्सी अनिल झेड कोठारी (रूपये ४४ लाख)
२. पत्र्याचे शेड नागरी दलीत वस्ती सन २०१३-२०१४ प्रभाग क्र.३४ मधील अमरधारम मध्ये पत्र्याचे शेड इले.मोटर (रूपये २६ लाख ९१ हजार)
३. प्रभाग क्र.२६ इंदिरानगर दलीत वस्ती मधील (रूपये ३३ लाख ३५ हजार)
४. कल्याण रोड डी.पी रस्ता BRGF मधील (रूपये ५२ लाख)

मा.श्री.दिप चव्हाण :- रू. १ कोटी १४ लाखाचे किती दिवस थांबवून ठेवले.

श्री. निंबाळकर , इंजि. :- ई - निविदा मंजूर जिल्हाधिकारी यांची मंजुरीसाठी १ ते १/२ वर्ष कालावधी लागतो.

मा.श्री. दिप चव्हाण :- नगरसचिव यांनी पत्र का दिले नाही हे विषय घेणे संदर्भात मुदत संपत आली त्याची रिमांयडर करायचे काम नगरसचिव यांचे होते.

मा.श्री. सचिन जाधव :- उदया असे होवू शकते. आपल्या समोर विषय न येता ४५ दिवसानंतर परस्पर मंजूरी घेवू शकतो.

मा.सभापती साहेब :- हे विषय घ्यायला पाहिजे मुदत संपत आली आहे हे तुम्ही कळविले का?

मा.श्री.दिप चव्हाण :- त्यात पैसे नाही, कोटीचे आकडे नाही ,आता जे विषय घेतले यात पैसे नाही ,आकडे नाही.

मा.सभापती साहेब :- आपल्या सभेतील विषय पत्रिकेवरील करीता घेतलेले विषय वाचन केले.

मा.श्री.दिप चव्हाण :- नगरसचिव संदर्भात निर्णय घ्यायला पाहिजे.

मा.सभापती साहेब :- आधी विषय मंजूर केलेले सर्व विषय अनधिकृत विषय आहेत. आम्हाला त्याबाबत काही कळविले नाही तुम्ही स्टॅण्डींगला कळवणार की नाही.

मा.श्री. दिप चव्हाण :- आम्हाला नगरसचिव यांनी सांगितले नाही. आयुक्त साहेबांनी कसे विषय मागविले, विषय दिले नाही म्हणून कारणे दाखवा नोटीस दिली असे तुम्ही सांगितले.

दिनांक२८/८/२०१५ला नगरसचिव विभागाने जे विषय पाठविले ते सभापतींना मिळाले नाही.

मा.श्री. दिप चव्हाण :- आयुक्त साहेबांनी ज्या मंजूरी दिल्या त्या थांबविण्यात याव्यात. अजेंडयावर विषय घेण्यात यावा. वर्कऑर्डर थांबवा.

मा.सभापती साहेब :- ठराविक विषय घेता ठराविक विषय घेवून पुन्हा आमच्याकडे पाठवता याचा अर्थ काय. २०१३ पासून विषय पडलेले आहेत.

मा.श्री. सचिन जाधव :- सगळी काम थांबवा विषय परत स्थायी समितीकडे पाठवा.

मा.सभापती साहेब :-अगोदर त्यांना विचारू

श्री.निंबाळकर शाखा अभियंता :- मा.आयुक्त साहेब यांच्या मान्यतेने सुरक्षा अनामत रक्कम भरलेली आहे.करारनामा पुर्ण केला आहे. काही कामांचे कार्यारंभ आदेश दिलेले आहेत.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- सभागृह जो काही निर्णय होईल त्याप्रमाणे कार्यवाही करू.

मा.सभापती साहेब :- आयुक्तांनी जे विषय मंजूर केले नगरसचिव यांनी जे पाठविले पण हे जे विषय घ्यायचे होते. ते एवढे अर्जंट होते. मग मा.सदस्यांना हे कळवले का.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- सगळी माहिती काढून माहिती देण्यात घेईल मा.सभापती साहेबांनी जो निर्णय दिला त्याबाबत आयुक्त साहेबांना अवगत करण्यात येईल.

मा.श्री. दिप चव्हाण :- डॉ. मानेची मुदत संपले का किती वर्षाचा कालावधीआहे.

आरोग्यधिकारी डॉ. राजूरकर :- २६/५/२०१५ ला इतिवृत्तात मंजूर डॉक्टरांना ऑर्डर गेलेल्या आहेत.

मा.श्री. कुमार वाकळे :- मागील इतिवृत्त कायम करण्यात यावे.
मा. श्री. संपत बारस्कर :- मागील इतिवृत्त कायम करण्यात यावे.
मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १ मंगळवार दिनांक २६/०५/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यात येत आहे.

**ठराव :-** सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.स्थायी समिती सभा क्रमांक- १ मंगळवार दिनांक २६/०५/२०१५ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस हि सभा मान्यता देत आहे.

सुचक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

अनुमादेक :- मा. श्री. संपत बारस्कर सही /-
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- १४ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल ) तसेच पंपचालक व विजतंत्री यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ : १) प्रदीप सदाशिव ढगे २) अमृता म्हातारदेव खाडे ३) राहुल सदाशिव गिते यांचा दिनांक १६ /०६/२०१५ रोजीचा अर्ज.

२) मनिष कैलास सोनवणे व इतर यांचा दिनांक १/६/२०१५ रोजीचा अर्ज.

३) मा.स्थायी समितीकडे इकडील जा.क्र. आस्था. वर्क. ५७ दिनांक १६/७/२०१५ अन्वये पाठविण्यात आलेला प्रस्ताव.

४) मा.मॅकेनिकल इंजि.पाणी पुरवठा विभाग प्रमुख त्यांचे कडील जा.क्र. पाणी पुरवठा विभाग ५४८ दिनांक ०१/०८/२०१५ अन्वयेचा अहवाल.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की , १) प्रदीप सदाशिव ढगे २) अमृता म्हातारदेव खाडे ३) राहुल सदाशिव गिते यांनी दिनांक १६/०६/२०१५ रोजी अर्ज देवुन "आम्ही खालील सही करणारे कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी / स्थापत्य) या पदावर पाणी पुरवठा विभागामध्ये कार्यरत आहे.आमची नेमणुक दि.०३/२/२०१५ पासुन दि.०२/०८/२०१५ पर्यत ६ महिन्यासाठी आहे. परंतु सदरची मुदत दिनांक ३/८/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे. तरी आम्हाला पाणी पुरवठा विभागाकडे पुन्हा काम करण्याची इच्छा आहे. या अनुषंगाने मला सेवेत मुदतवाढ मिळावी . " असे नमुद करुन विनंती केलेली आहे. तसेच दिनांक १/६/२०१५ रोजी मनिष कैलास सोनवणे व इतर यांनी अर्ज देवुन त्यामध्ये " खालील सह्या करणारे कर्मचारी पाणी पुरवठा विभागामध्ये कंत्राटी करारबध्द नेमणुकीनुसार पंपचालक / विजतंत्री पदावर तात्पुरत्या स्वरुपात पाणी पुरवठा योजनेवर काम करीत आहे. सदर कराराची मुदत दि. २/८/२०१५ रोजी संपत आहे. तरी मला तात्पुरत्या स्वरुपात पुढील कालावधी करीता मानधनावर नेमणूक करण्यात यावी.असे नमुद करुन विनंती केलेली आहे.

त्यानुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरु पात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल) तसेच पंपचालक व विज तंत्री या पदांवर अटी व शर्ती नुसार संबधीतांची तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे निर्णया करीता इकडील जा.क्र.आस्था. वर्क. ५७ दिनांक १६/७/२०१५ अन्वये पाठविण्यात आलेला होता. तथापि अद्यापर्यत मा.स्थायी समितीची बैठक न झाल्याने उपरोक्त प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळालेली नाही.

दरम्यानच्या काळात मा.मॅकेनिकल इंजि.पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र. पाणी पुरवठा विभाग ५४८दिनांक०१/०८/२०१५अन्वये इकडेस अहवाल देवुन त्यामध्ये"अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा विभागातील अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व मेकॅनिकल तसेच पंपचालक व वीजतंत्री यापदी तांत्रिक खंड देवुन

अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतची कार्यवाही आपले विभागामार्फत चालु आहे. कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व मेकॅनिकल यांची दि.०३/०८/२०१५ रोजी तसेच पंपचालक व विजतंत्री यांची मुदत दि.०२/०८/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे.सदरचा प्रस्ताव आस्थापना विभागाकडुन मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला असल्याचे समजते.परंतु मा.स्थायी समिती सभा होणेसाठी काहीसा अवधी लागणार आहे. सद्यस्थितीत पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी कनिष्ठ अभियंता व पंपचालक व वीजतंत्री यांची अत्यंत आवश्यकता भासत आहे. त्यामुळे मानधनावर कर्मचारी यांनी नियुक्ती होणे गरजेचे आहे. तरी सदर कर्मचारी यांना तांत्रिक खंड देवुन त्यांची पुर्ननियुक्ती लवकरात लवकर करण्यात यावी . असे नमुद करुन विनंती केलेली आहे. सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३५ दिनांक ३१/१/२०१५ अन्वयेच्या पारीत ठरावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिक) व (सिव्हील) , पंपचालक व विजतंत्री या पदांवर अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती केलेल्या संबधीतांची त्या बाबतची माहीती खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राहुल सदाशिव गिते | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | २०,०००/- | ८५२३ ११/०३/२०१५ | ०३/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | ०२/०८/२०१५ |
| २ | प्रदिप सदाशिव ढगे | कनिष्ठ अभियंता मेकॅनिकल) | २०,०००/- | ८५२३ ११/०३/२०१५ | ०३/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | ०२/०८/२०१५ |
| ३ | अमृता म्हातारदेव खाडे | कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) | २०,०००/- | ८५२३ ११/०३/२०१५ | ०३/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | ०२/०८/२०१५ |
| ४ | बल्लाळ किरण सुरेश | कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) | २०,०००/- | ८५२२ ११/०३/२०१५ | २७/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | २६/८/२०१५ |
| ५ | महेश बाळासाहेब कुळधर | पंपचालक | ७,५००/- | ८५२० ११/०३/२०१५ | ०३/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | ०२/०८/२०१५ |
| ६ | मनिष कैलास सोनवणे | पंपचालक | ७,५००/- | ८५२० ११/०३/२०१५ | ०३/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | ०२/०८/२०१५ |
| ७ | राकेश गोरक्षनाथ तेलोरे | पंपचालक | ७,५००/- | ८५२० ११/०३/२०१५ | ०३/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | ०२/०८/२०१५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | खान जावेद रफिक | विजतंत्री | ७,५००/- | ८५२० ११/०३/२०१५ | ०३/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | ०२/०८/२०१५ |
| ९ | प्रसाद मुरलीधर हातवळणे | विजतंत्री | ७,५००/- | ८५२० ११/०३/२०१५ | ०३/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता | ०२/०८/२०१५ |

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर सद्यस्थितीमध्ये पाणी पुरवठा विभागा करीता कनिष्ठ अभियंता (मॅकेनिक) व (सिव्हील) व पंपचालक व विजतंत्री या पदांची मंजुर पदे , भरलेली पदे व रिक्त पदे खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | पदनाम | मंजुर पद संख्या | भरलेली पद संख्या | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (मॅकेनिक) | १ | १ | ----------- |
| २ | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | मंजुर नाही | ----------- | ----------- |
| ३ | पंपचालक | १२ | ०३ | ०९ |
| ४ | विजतंत्री | १३ | ०७ | ०६ |
| | एकुण | २६ | ११ | १५ |

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव हा पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यत सदर आकृतीबंधास मा.शासनाकडून मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही . " असे नमुद केलेले आहे.

वरील तक्त्यामधील अनु.क्र. ४ बल्लाळ किरण सुरेश व अनु .क्र. ५ महेश बाळासाहेब कुळधर यांनी पुढील पुर्नेनेमणुक होणे बाबत इकडेस विनंती अर्ज दिलेला नसल्यामुळे ते पुढील सहा महिन्या करीता मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्नेनियुक्तीस इच्छुक नसल्याचे दिसुन येत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत शहर व उपनगरामध्ये सद्यस्थितीमध्ये मा. केंद्र शासन व मा. महाराष्ट्र शासन यांचे अनुदानातुन फेज - २ अंर्तगत नव्याने पाईप लाईन टाकणेचे कामे प्रगती पथावर असुन नागरिकांच्या पाणी वितरण दृष्टीकोनातुन अत्यावश्यक सेवेची बाब असल्यामुळे मा. मेकॅनिकल इंजि. पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे कडील संदर्भ क्र. ४ जा.क्र. पाणी पुरवठा विभाग ५४८ दिनांक ०१ / ०८ / २०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) व (सिव्हील) तसेच पंपचालक , विजतंत्री या पदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्नेनेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्नेनियुक्ती करून तद्नंतर सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी सामितीची कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत खास बाब म्हणुन निर्णय झाल्यास त्याकामी दरमहा रु.९०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च रुपये ५,४०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | राहुल सदाशिव गिते | कनिष्ठ अभियंता ( मेकॅनिकल) | २०,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| २ | प्रदिप सदाशिव ढगे | कनिष्ठ अभियंता ( मेकॅनिकल) | २०,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ३ | अमृता म्हातारदेव खाडे | कनिष्ठ अभियंता ( सिव्हील) | २०,०००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ४ | मनिष कैलास सोनवणे | पंपचालक | ७,५००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ५ | राकेश गोरक्षनाथ तेलोरे | पंपचालक | ७,५००/- | पाणी पुरवठा विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | खान जावेद रफिक | विजतंत्री | ७,५००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ७ | प्रसाद मुरलीधर हातवळणे | विजतंत्री | ७,५००/- | पाणी पुरवठा विभाग |

मा. मेकॅनिकल इंजि . पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे कडील संदर्भ क्र. ४ जा.क्र. पाणी पुरवठा विभाग ५४८ दिनांक ०१ / ०८ / २०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तातपुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (मॅकेनिकल) व (सिव्हील) तसेच पंपचालक , विजतंत्री या पदांवर वरील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सहा महिन्या करीता केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्नेनेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करुन तद्नंतर सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत निर्णय झाल्यास उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे./ अ

तरी उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

**सोबत :-**सदर कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्ती आदेशा बाबतचा प्रारूप मसूदा येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे

यावर प्र. सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की, मा.मु.ले.अ. व मा. मु.ले.प. यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मा. मुख्य लेखा अधिकरी यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत मान्यतेस्तव सादर.

यावर मा. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र मनपा अधिनियम (सुधारित) २०११ चे क ५३ (३) नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही./ ब

यावर मा.उपायुक्त (सा.) साहेब यांचा अभिप्राय की , अ व ब नुसार मान्यतेस्तव

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तातपुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल ) तसेच पंपचालक व विजतंत्री यापदी तांत्रिक या पदावर मानधनावरील केलेल्या करारबध्द नियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला

मा.सौ. उषा ठाणगे :- माझे वॉर्डात दोन पंपचालक व इलेक्ट्रीशियन दोन कर्मचारी देण्यांत यावे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- मॅडमच्या वॉर्डात मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात यावे.

मा.श्री. दिप चव्हाण :- वॉलमनच्या संदर्भात विषय घेण्यात यावा. नेहमी अडचण येते

मा.सभापती साहेब :- किती वॉलमन आहेत याची माहिती घेवून कार्यवाही करावी.

मा.श्री. कुमार वाकळे:-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्रीमती मंगला गुंदेचा :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व (मॅकेनिकल ) तसेच पंपचालक व विजतंत्री यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरीस हि सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा. श्रीमती मंगला गुंदेचा सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- १५ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती नुसार प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ : प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा.जा.क्र. ३८१ दिनांक ०८/०७/२०१५ अन्वयेचा प्रस्ताव.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की , प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. यांनी त्यांचेकडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ३८१ दि.०८/०७/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये "जा.क्र.आस्थापना कंत्राटी नेमणूक २१३४ दिनांक ३०/०६/२०१५ अन्वये १) डॉ.सौरभ लिमये , २) डॉ. मनिषा मनोहर गडदे ह्या वैद्यकीय अधिकारी या पदावर करारबध्द पध्दतीने दिनांक २१/०२/२०१५ पासुन सहा महिन्यांकरीता कै.बा.दे.दवाखाना येथे हजर झालेले आहेत. त्यांच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक २०/०८/२०१५ रोजी संपत आहे . तसेच आस्थापना जा.क्र. २१३७ दिनांक ३०/०६/२०१५ अन्वये डॉ. सौ. ज्योती शिंदे (सोनवणे) यांची वैद्यकीय अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने ३१/०३/२०१५ पासुन सहा महिन्या करीता नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यांच्या नेमणूकीचा कालावधी दिनांक ३०/०९/२०१५ रोजी संपत आहे. वरील वैद्यकीय अधिका-यांचे नेमणूक कालावधीमध्ये काम समाधानकराक आहे. त्यांनी पुढिल कालावधीसाठी पुर्ननेमणुक करणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. तरी १) डॉ.सौरभ लिमये ,२) डॉ. मनिषा गडदे यांना नियमा प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दिनांक २३/०८/२०१५ पासुन सहा महिन्याकरीता व डॉ. सौ. ज्योती शिंदे (सोनवणे) यांना नियमा प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दिनांक ०२/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता कै .बा. दे. दवाखान्यासाठी वैद्यकीय अधिकारी या पदावर करारबध्द पध्दतीने मानधनावर पुननेमणुक करणेस शिफारस आहे. " असे नमुद निर्देशित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह १०१३ दिनांक २६/०२/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावावरील मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३ दिनांक २६/५/२०१५ अन्वयेच्या पुर्व मंजुरी ठरावाच्या अनुषंगाने १) डॉ.सौरभ अनिल लिमये , २) डॉ. मनिषा मनोहर गडदे यांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक २१३६ दि. ३०/०६/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक २१/०२/२०१५ पासुन सहा महिन्यांकरीता व डॉ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक २१३७ दि. ३०/६/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक ३१/०३/२०१५ पासुन सहा महिन्या करीता कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदांवर रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननेमणूक करण्यात आलेली आहे.

सदर १) डॉ.सौरभ अनिल लिमये , २) डॉ. मनिषा मनोहर गडदे , यांची वरील तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्नेनेमणूकीची मुदत ही अनुक्रमे दिनांक २० / ०८ / २०१५ रोजी समाप्त होणार आहे.

सदर डॉ. ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची वरील तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्नेनेमणूकीची मुदत ही दिनांक ३० / ०९ / २०१५ रोजी समाप्त होणार आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेचा विचार होवुन करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी अटी व शर्ती प्रमाणे जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक २१३४ दिनांक ३०/०६/२०१५ व जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक २१३७ दिनांक ३०/०६/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करिता मानधनावर खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे संबधितांची मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सद्यस्थितीमध्ये खालील प्रमाणे करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी मानधनावर कार्यरत आहेत. त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | नांव | पदनाम | दरमहा मानधन | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.सौरभ अनिल लिमये | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | २१/०२/२०१५ | २०/०८/२०१५ |
| २ | डॉ.मनिषा मनोहर गडदे | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/ | २१/०२/२०१५ | २०/०८/२०१५ |
| ३ | डॉ. ज्योती लालासाहेब शिंदे ( सोनवणे) | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/ | ३१/०३/२०१५ | ३०/०९/२०१५ |

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर सद्यस्थितीमध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्या करीता वैद्यकीय अधिकारी यापदांची , मंजुर , भरलेली पदे व रिक्त पदे खालील प्रमाणे आहेत.

| अ. नं. | पदनाम | मंजुर पद संख्या | भरलेली पद संख्या | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | लेडी डॉक्टर इनचार्ज | १ | १ | ------- |
| २ | लेडी डॉक्टर (पुरुष) | १ | ----- | १ |
| ३ | लेडी डॉक्टर (स्त्री) | १ | १ | -------- |
| | एकुण | ३ | २ | १ |

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यंत सदर आकृतीबंधास मा.शासनाकडून मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही . " असे नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवे करीता सद्यस्थितीमध्ये आस्थापना कायम सुचीवर वैद्यकीय अधिकारी ही पदे अत्यंत कमी प्रमाणात मंजुर आहेत. त्यामुळे मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ३८१ दिनांक ०८/०७/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावामध्ये मागणी नमुद केल्यामुळे त्याअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरीने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदी १) डॉ.सौरभ अनिल लिमये , २) डॉ. मनिषा मनोहर गडदे यांची तांत्रिक खंड देवुन दिनांक २३ / ०८ / २०१५ पासुन सहा महिन्या करीता व डॉ. सौ.ज्योती लालासाहेब शिंदे (सोनवणे) यांची त्यांची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक ०२/१०/२०१५ पासुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारा नुसार रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी खास बाब म्हणुन निर्णय झाल्यास त्याकामी दरमहा रुपये ६०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ३,६०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बादे.दवा. यांचे कडील जा.क्र. कै.बा.दे.दवा. व सुतीका गृह ३८१ दिनांक ०८ / ०७ / २०१५ अन्वयेच्या प्रस्तावा अनुषंगाने कै. बाळासाहेब देशपांडे अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी या पदांवर खालील तक्त्यात दर्शविल्यांची त्यांची अटी व शर्ती नुसार सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन नमुद केलेल्या दिनांका पासुन पुढील सहा महिन्या करीता रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.सौरभ अनिल लिमये | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| २ | डॉ.मनिषा मनोहर गडदे | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/ | कै.बा.दे.दवा. |
| ३ | डॉ. ज्योती लालासाहेब शिंदे ( सोनवणे) | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/ | कै.बा.दे.दवा. |

तरी उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

यावर प्र. सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, मा.मुलेअ व मा. मुलेप यांचा अभिप्राय घेणेत यावा.

यावर मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केलेप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" नुसार महाराष्ट्र मनपा अधि.(सुधारित) २०१२ चे कलम ५३ प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा) साहेब यांचा अभिप्राय की, मा.स्थायी समिती समोर मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे योग्य

यावर मा. आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती नुसार प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा विषय आहे.

मा. श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. कुमार वाकळे:-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.
मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता ऑफिस रिपोर्ट नुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती देणेस मंजूरी देण्यांत येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- १६ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री,पंपचालक व जोडारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस मंजूरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

संदर्भ : सागर आसाराम खताडे व इतर ६ यांचा दि.०६/०८/२०१५ रोजीचा अर्ज.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की,सागर आसाराम खताडे व इतर ६यांनी ०६/०८/२०१५रोजी अर्ज देवुन"पाणी पुरवठा विभागामध्ये कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर विळद / मुळानगर पाणी पुरवठा केंद्र येथे पंपचालक/ विजतंत्री या पदावर काम करीत आहे. सदर कामासाठी मुदत दि.२९/९/२०१५रोजी संपत आहे.तरी मला या विभागाकडे पुन्हा काम करण्याची इच्छा असुन मला तात्पुरत्या स्वरुपात पुढील ६महिन्याकरीता नेमणुक करण्यात यावी."असे नमुद करुन विनंती केलेली आहे.

पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता या पदांवर अटी व शर्ती नुसार राहुल सदाशिव गिते व इतर यांची तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे निर्णया करीता इकडील जा.क्र.आस्था. वर्क. ७६१३ दिनांक ३१/१/२०१५ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

मा.स्थायी समितीच्या दिनांक ३१/१/२०१५ रोजीच्या बैठकीमध्ये सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३५ दिनांक ३१/१/२०१५ अन्वये परिच्छेद क्रमांक २,३,४ मध्ये खालील प्रमाणे ठराव पारीत करुन निर्देशित केलेले होते.

"तसेच आजच प्राप्त ऑफिस रिपोर्टच्या अनुशंगाने पाणी पुरवठा विभागातील अत्यावश्यक सेवेचा तात्काळ विचार करता तसेच पाणी पुरवठा विभाग प्रमुख श्री.परिमल निकम यांनी सभेत विषय केलेली आवश्यकता व मा.सदस्यांनी त्यावर केलेल्या चर्चेनुसार पाणी पुरवठा विभागातील तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता यापदी १) श्री. राहुल सदाशिव गिते ,१) श्री.प्रदिप सदाशिव ढगे व ३) अमृता म्हातारदेव खाडे यांची तांत्रिक खंड देवुन दिनांक ३/२/२०१५ पासुन सहा महिन्याकरीता नमुद मानधनावर व बल्लाळ किरण सुरेश यांची तांत्रिक खंड देवुन दिनांक २७/२/२०१५ पासुन सहा महिन्याकरीता नमुद मानधनावर अटि व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही मान्यता देण्यात येत आहे.

तसेच १) महेश बाळासाहेब कुळधर व इतर यांची तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक या पदी व १) खान जावेद रफिक व इतर यांची विजतंत्री यापदी तांत्रिक खंड देवुन दि.३/२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता नमुद मानधनावर अटि व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस ही मान्यता देण्यात येत आहे. तसेच सागर आसाराम खताडे व इतर यांची तात्पुरत्या स्वरुपात विजतंत्री या पदी तसेच १) नागापुरे संजय हिरामण व इतर यांची तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक या पदी तसेच १) मुरकुटे नितीन आण्णासाहेब व इतर यांची तात्पुरत्या स्वरुपात जोडारी या पदी त्यांची यापुर्वीची केलेल्या मानधनावरील करारबध्दाची मुदत

समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता नमुद मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यास ही मान्यता देत आहे. खर्च मंजुर. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३५ दिनांक ३१/१/२०१५ अन्वयेच्या पारीत ठरावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात विजतंत्री , पंपचालक व जोडारी या पदांवर अटी व शर्ती नुसार तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती केलेल्या संबधीतांची सद्यस्थिती बाबतची माहीती खालील प्रमाणे तक्त्यात दर्शविण्यात येत आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रु | जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक व दि. | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सागर आसाराम खताडे | विज तंत्री | ७,५००/- | ८८२७ २७/०३/२०१५ | ३०/०३/२०१५ | २९/९/२०१५ |
| २ | नितीन किशोर हुशारे | विज तंत्री | ७,५००/- | ८८२७ २७/०३/२०१५ | ३०/०३/२०१५ | २९/९/२०१५ |
| ३ | नागापुरे संजय हिरामण | पंपचालक | ७,५००/- | ८८२७ २७/०३/२०१५ | ३०/०३/२०१५ | २९/९/२०१५ |
| ४ | साळवे शरद मल्हारी | पंपचालक | ७,५००/- | ८८२७ २७/०३/२०१५ | ३०/०३/२०१५ | २९/९/२०१५ |
| ५ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | ७,५००/- | ८८२७ २७/०३/२०१५ | ३०/०३/२०१५ | २९/९/२०१५ |
| ६ | तांबे गौतम भास्कर | पंपचालक | ७,५००/- | ८८२७ २७/०३/२०१५ | ३०/०३/२०१५ | २९/९/२०१५ |
| ७ | मुरकुट नितीन अन्नासाहेब | जोडारी | ७,५००/- | ८८२७ २७/०३/२०१५ | ३०/०३/२०१५ | २९/९/२०१५ |

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर सद्यस्थितीमध्ये पाणी पुरवठा विभागा करीता पंपचालक , विजतंत्री व जोडारी या पदांची मंजुर पदे , भरलेली पदे व रिक्त पदे खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | पदनाम | मंजुर पद संख्या | भरलेली पद संख्या | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | पंपचालक | १२ | ०३ | ०९ |
| २ | विजतंत्री | १३ | ०७ | ०६ |
| ३ | जोडारी | ०५ | ०२ | ०३ |
| | एकुण | ३० | १२ | १८ |

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव हा पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यत सदर आकृतीबंधास मा.शासनाकडून मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महि-न्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ता-ने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे नि-नहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही . "असे नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत शहर व उपनगरामध्ये सद्यस्थितीमध्ये मा. केंद्र शासन व मा. महाराष्ट्र शासन यांचे अनुदानातुन फेज -२ अंर्तगत नव्याने पाईप लाईन टाकणेचे कामे प्रगती पथावर आहे व आस्थापना सुचीवर पंपचालक,विजतंत्री व जोडारी असे पदनाम बहुतांशी रिक्त आहेत व सद्यस्थिती मध्ये कायम पद संख्या अत्यंत कमी स्वरुपात मंजुर असल्याने नागरिकांच्या पाणी वितरण दृष्टीकोनातुन अत्यावश्यक सेवेची बाब असल्यामुळे तसेच मा.मेकॅनिकल इंजि.पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे यापुर्वीच्या मागणी प्रस्तावाच्या अनुषंगाने व संदर्भिय अर्जाच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीची पुर्व मंजुरीने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक , विजतंत्री व जोडारी या पदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्नेनेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे

कामी खास बाब म्हणुन निर्णय झाल्यास त्याकामी दरमहा रुपये ५२,५००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च रुपये ३,१५,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | सागर आसाराम खताडे | विज तंत्री | ७,५००/- | पाणी पुरवठा विभाग |
| २ | नितीन किशोर हुशारे | विज तंत्री | ७,५००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ३ | नागापुरे संजय हिरामण | पंपचालक | ७,५००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ४ | साळवे शरद मल्हारी | पंपचालक | ७,५००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ५ | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | ७,५००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ६ | तांबे गौतम भास्कर | पंपचालक | ७,५००/- | पाणी पुरवठा विभाग |
| ७ | मुरकुटे नितीन अन्नासाहेब | जोडारी | ७,५००/- | पाणी पुरवठा विभाग |

मा. मेकॅनिकल इंजि . पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे यापुर्वीच्या मागणी प्रस्तावाच्या अनुषंगाने व संदर्भिय अर्जाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक , विजतंत्री व जोडारी या पदांवर वरील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सहा महिन्या करीता केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्ननेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे

यावर प्र.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, मुलेअ

यावर मा. मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, आस्थापना प्रमुख यांनी प्रस्तावीत केलेनुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे रिक्त पदाचे अनुषंगाने महाराष्ट्र मनपा अधिनियम २०११ चे कलम ५३(३) प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री,पंपचालक व जोडारी यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस मंजूरी मिळणे बाबतचा हा विषय आहे.

मा. श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. कुमार वाकळे:-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री,पंपचालक व जोडारी यापदी तांत्रिक खंड देवून दिनांक ०३/१०/२०१५ पासून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता ऑफिस रिपोर्ट नुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- १७ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना फिरता दवाखाना व रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, परिचारीका व लॅब टेक्निशियन यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्यात्तर मंजूरी मिळणे बाबत.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

संदर्भ : **मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. यांचे कडील जा.क्र. ५११ दि. २०/६/२०१५ अन्वयेचा प्रस्ताव.**

१) कै.बा.दे.दवा.जा.क्र.३२२ दि.२२/०६/२०१५अन्वयेचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडे इकडील जा.क्र.आस्था. वर्क.५८दिनांक १६/०७/२०१५ अन्वये पाठविण्यात आलेला प्रस्ताव.

३) कै.बा.दे.दवा.जा.क्र.३२३ दि.२२/०६/२०१५अन्वयेचा प्रस्ताव.

४) मा.स्थायी समितीकडे इकडील जा.क्र.आस्था. वर्क. ५८ दिनांक १६/०७/२०१५ अन्वये पाठविण्यात आलेला प्रस्ताव.

५) कै.बा.दे.दवा.जा.क्र.३७० दि.०४/०७/२०१५अन्वयेचा प्रस्ताव.

६) मा.स्थायी समितीकडे इकडील जा.क्र.आस्था. वर्क.७४ दिनांक २३/०७/२०१५ अन्वये पाठविण्यात आलेला प्रस्ताव.

७) कै.बा.दे.दवा.जा.क्र.३८१ दि.०८/०७/२०१५अन्वयेचा प्रस्ताव.

८) मा.स्थायी समितीकडे इकडील जा.क्र.आस्था. वर्क. ८७ दिनांक २०/०८/ २०१५ अन्वये पाठविण्यात आलेला प्रस्ताव.

९) रक्तपेढी जा.क्र.९३ दि.२३/७/२०१५ अन्वयेचा प्रस्ताव.

१०) सदर बाबत दिनांक २४ / ०७ / २०१५ रोजी प्रस्ताव सादर करुन मिळालेली मंजुरी बाबत.

११) रक्तपेढी विभाग यांचा दिनांक २६/०८/२०१५ अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्त संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्यात येतो की ,कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह ५११ दिनांक २०/८/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना सुतिका गृह व फिरता दवाखाना या अत्यावश्यक सेवा नागरिकांना अविरत पुरविणे कामी तांत्रिक स्टाफ अभावी गैरसोय होऊ नये म्हणुन खालील प्रमाणे कंत्राटी स्टाफ करार पध्दतीने सहा महिन्याकरीता मानधनावर भरण्यात आलेला आहे.त्यांच्या नेमणुकीचा खालील प्रमाणे-

| अ. क्र. | कंत्राटी कर्मचा-याचे नाव | पद | कार्यरत विभाग | नेमणुक दिनांक | नेमणुक कालावधी संपण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.डॉ.सौरभ लिमये | वै.अ. | कै.बा.दे.दवा. | २१/०२/२०१५ | २०/०८/२०१५ |
| २ | डॉ.मनिषा गडदे | वै.अ. | कै.बा.दे.दवा. | २१/०२/२०१५ | २०/०८/२०१५ |
| ३ | डॉ.ज्योती शिंदे (सोनावणे) | वै.अ. | कै.बा.दे.दवा. | ३१/०३/२०१५ | ३०/०९/२०१५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | डॉ.सौ.रेणुका जोशी | वै.अ. | कै.बा.दे.दवा. | २३/१२/२०१४ | २२/०६/२०१५ |
| ५ | डॉ.सौ.शुभदा वाघ (मदने) | वै.अ. | कै.बा.दे.दवा. | २३/१२/२०१४ | २२/०६/२०१५ |
| ६ | डॉ.सौ.सुनिता गाडेकर | वै.अ. | कै.बा.दे.दवा. | २३/१२/२०१४ | २२/०६/२०१५ |
| ७ | डॉ.सौ.वैष्णवी गोपाळघरे | वै.अ. | कै.बा.दे.दवा. | २३/१२/२०१४ | २२/०६/२०१५ |
| ८ | सौ.निलिमा हिवाळे | परिचारीका | कै.बा.दे.दवा. | २३/१२/२०१४ | २२/०६/२०१५ |
| ९ | सौ.रेखा अमोलिक | परिचारीका | कै.बा.दे.दवा. | २३/१२/२०१४ | २२/०६/२०१५ |
| १० | सौ.तृप्ती बडे | परिचारीका | कै.बा.दे.दवा. | २३/१२/२०१४ | २२/०६/२०१५ |
| ११ | सौ.शुभांगी काळे | परिचारीका | कै.बा.दे.दवा. | २३/१२/२०१४ | २२/०६/२०१५ |
| १२ | सौ.शितल शिंदे | परिचारीका | कै.बा.दे.दवा. | २३/१२/२०१४ | २२/०६/२०१५ |
| १३ | डॉ.श्री.सुरेश घोलप | वै.अ. | फिरता दवा. | १६/०२/२०१५ | १५/०८/२०१५ |

वरील तक्त्यातील बहुतांश कर्मचा-यांच्या नेमणुकी संपलेल्या आहेत तसेच काही कर्मचा-यांच्या नेमणुका लवकरच संपणार आहेत.सदरच्या नेमणुका ह्या अत्यावश्यक सेवेकरीता असुन सदरच्या पदां अभावी दवाखान्यामध्ये अडचण निर्माण होत आहे. सदरचे कर्मचा-यांचे पुनर्नेमणुकीकरीता प्रस्ताव आस्थापना विभागाकडे प्रशासकीय मंजुरी घेऊन वेळोवेळी पाठविण्यात आलेले आहे.सदरचे पुनर्नेमणूकीचे प्रस्ताव आस्थापना विभागामार्फत मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यात आलेले आहेत.सध्या काही तांत्रिक अडचणीमुळे स्थायी समितीची सभा लवकर होणे दिसत नाही.त्यामुळे नेमणुका संपलेल्या कर्मचा-यांचे पुनर्नेमणुकीचे आदेश या कार्यालयास अद्याप पर्यत प्राप्त झालेले नाहीत.त्यामुळे दवाखान्याचा अत्यावश्य्क कामामध्ये अडचण व अडथळा निर्माण होत आहे.यापुर्वी जा.क्र.आस्था.करारबध्द २४४८ दिनांक १३/०७/२०१५ अन्वये रक्तपेढी विभागाच्या अत्यावश्यक सेवेकरीता मानधनावरील कर्मचा-यांना पुनर्नेमणुक आदेश देऊन प्रस्ताव आस्थापना विभागामार्फत कार्योत्तर मंजुरीकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेले आहेत.तरी रक्तपेढी विभागाच्या मानधनावरील कर्मचा-यांच्या सदरील नेमणुकांच्या धर्तीवर वरील तक्त्यातील कर्मचा-यांच्या नेमणुक कालावधीनंतर नियमानुसार तांत्रिक खंड देऊन पुर्ननेमणुक पुढील सहा महिन्या करीता करुन कार्योत्तर मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे प्रस्ताव पाठविणे उचित वाटते.तरी सदर वरील तक्त्यातील मानधनावरील कर्मचा-यांना कामावर पुढे या विभागांमध्ये कार्यरत ठेवण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणे कामी प्रस्ताव मंजुरीस्तव व पुर्नेमणुकीचे आदेश देणे कामी आस्थापना विभागास आदेश होणे बाबत ."नमुद करुन निर्देशित केलेले आहे.

सदर प्रस्तावावर मा.प्र.वैद्यकीय आरोग्याधिकारी यांनी "प्रस्तावित 'अ' प्रमाणे मनपा,दवाखाने , रक्तपेढी व कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसृतीगृह येथील वैद्यकीय व निमवैद्यकीय कर्मचारी यांच्या तात्पुरत्या स्वरुपातील नेमणुका नंतर पुर्ननियुक्ती बाबत अत्यावश्यक सेवेचा विचार करता प्रशासकीय मंजुरीने पुर्ननियुक्ती दयावी आणि कार्योत्तर मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे विषय घेणे योग्य होईल असे वाटते जेणे करुन दवाखान्याची व प्रसुतीगृहाची सेवा देताना अडचण निर्माण होणार नाही सबब प्रस्तावित केलेल्या सर्व कर्मचारी यांना तातडीने पुर्ननियुक्ती आदेश देणेस व पुढील कार्यस्तव." असे नमुद करुन निर्देशित केलेले आहे.

तसेच संदर्भ क्र. ११ नुसार रक्तपेढी विभाग यांनी दिनांक २६/०८/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी लॅब टेक्निशियन पल्लवी दगडु मोरे यांची मानधनावर नेमणुका सहा महिन्यासाठी आहे.त्यांची मुदत दि.२६/०८/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे. मा.अन्न व औषध प्रशासन कायदा १९४५ यांचे नियमानुसार रक्तपेढी २४ तास चालु ठेवण्यासाठी व रक्तपेढीच्या कामात खंड पडु नये म्हणुन सदरील तांत्रिक कर्मचा-याची रक्तपेढीसाठी आवश्यकता आहे.या कर्मचा-याची नावाची नोंद मा.अन्न व औषध प्रशासन , महाराष्ट्र राज्य नाशिक विभाग यांचे कार्यालयाकडे झालेली आहे.सदर कर्मचा-यांचा पुर्ननेमणुकीसाठीचा प्रस्ताव जा.क्र.९३ दि.२३/७/२०१५ रोजी सादर केला असुन त्यावर आस्थापना विभागामार्फत सदरचा पुर्ननेमणुकीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यात आल्यामुळे आस्थापना विभागामार्फत या कर्मचा-यांचा नेमणुकीचा आदेश या कार्यालयास मिळालेला नाही त्यामुळे रक्तपेढी कामकाजामध्ये प्रशासकीय व तांत्रिक दृष्ट्या अडथळा निर्माण होत आहे.तरी सदर कर्मचा-यास नियमानुसार तांत्रिक खंड देऊन पुढील पुर्ननेमणुक सहा महिन्या करीता करुन कार्योत्तर मंजुरीसाठी मा.स्थायी समितीपुढे प्रस्ताव पाठविणे उचीत वाटते अन्यथा रक्तपेढीच्या तांत्रिक कामकाजामध्ये अडचणी येऊ शकतात व रक्तपेढीचा सेवा विस्तळीत होऊ शकते.तरी सदर कर्मचा-यांस कामावर पुढे या विभागामध्ये कार्यरत ठेवण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणेकामी प्रस्ताव मंजुरीस्तव व पुर्ननेमणुकीचे आदेश देणे कामी ."असे नमुद करुन सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतिकागृह ३२२ दि.२२/६/२०१५ अन्वये व जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतिकागृह ३२३ दि.२२/६/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स यापदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधीतांची त्यांची जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ६६७२ दिनांक २३/१२/२०१४ अन्वये व जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ६६७३ दिनांक २३/१२/२०१४ अन्वये सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द नेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक २५/०६/२०१५ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा यापुर्वी जा.क्र.आस्था.वर्क.५८ दिनांक १६/७/२०१५ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला आहे.तथापि अद्याप पर्यत मा.स्थायी समितीची बैठक न झाल्याने सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळालेली नाही .

सदरचा तपशिल खालील प्रमाणे --------------

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. रेणूका प्रणव जोशी | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | २३/१२/२०१४ | २२/६/२०१५ |
| २ | डॉ.वैष्णवी मोतीलाल गोपाळघरे | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | २३/१२/२०१४ | २२/६/२०१५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | डॉ.सुनिता भगवान गाडेकर | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | २३/१२/२०१४ | २२/६/२०१५ |
| ४ | डॉ. शुभदा बाबासाहेब वाघ (मदने) | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | २३/१२/२०१४ | २२/६/२०१५ |
| ५ | रेखा रमेश अमोलिक | स्टाफ नर्स | ८,०००/- | २३/१२/२०१४ | २२/६/२०१५ |
| ६ | निलिमा सतीष हिवाळे | स्टाफ नर्स | ८,०००/- | २३/१२/२०१४ | २२/६/२०१५ |
| ७ | शिंदे शितल गंगाराम | स्टाफ नर्स | ८,०००/- | २३/१२/२०१४ | २२/६/२०१५ |
| ८ | शुभांगी अण्णासाहेब काळे | स्टाफ नर्स | ८,०००/- | २३/१२/२०१४ | २२/६/२०१५ |
| ९ | तृप्ती रावसाहेब बडे | स्टाफ नर्स | ८,०००/- | २३/१२/२०१४ | २२/६/२०१५ |

तसेच सद्यस्थितीमध्ये मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतिकागृह ३८१ दि.०८/०७/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधीतांची त्यांची जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक २१३४ दिनांक ३०/०६/२०१५ अन्वये व जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक २१३७ दिनांक ३०/०६/२०१५ अन्वये सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द नेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन अनुक्रमे १,२, यांची दिनांक २३/०८/२०१५ व अनु.क्रं. ३ यांची दिनांक ०२/१०/२०१५ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा यापुर्वी जा.क्र.आस्था.वर्क. ८७ दिनांक २०/८/२०१५ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला आहे. तथापि अद्याप पर्यत मा.स्थायी समितीची बैठक न झाल्याने सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळालेली नाही .

सदरचा तपशिल खालील प्रमाणे --------------

| अ. नं. | नांव | पदनाम | दरमहा मानधन | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.सौरभ अनिल लिमये | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | २१/०२/२०१५ | २०/०८/२०१५ |
| २ | डॉ.मनिषा मनोहर गडदे | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/ | २१/०२/२०१५ | २०/०८/२०१५ |
| ३ | डॉ. ज्योती लालासाहेब शिंदे ( सोनवणे) | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/ | ३१/०३/२०१५ | ३०/०९/२०१५ |

तसेच सद्यस्थितीमध्ये मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी,कै.बा.दे.दवा.यांचे कडील जा.क्र.कै.बा.दे.दवा. व सुतिकागृह ३७० दि.०४/०७/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी यापदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधीतांची त्यांची जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक २७३ दिनांक १६/०४/२०१५ अन्वये दि. १६/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक १८/०८/२०१५ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मा.स्थायी समितीची पुर्व

मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा यापुर्वी जा.क्र.आस्था.वर्क. ७४ दिनांक २३/७/२०१५ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला आहे. तथापि अद्याप पर्यत मा.स्थायी समितीची बैठक न झाल्याने सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळालेली नाही .

सदरचा तपशिल खालील प्रमाणे --------------

| अ. नं. | नांव | पदनाम | दरमहा मानधन | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.सुरेश विलास घोलप | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | १६/०२/२०१५ | १५/०८/२०१५ |

तसेच सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभाग जा.क्र. ९३ दिनांक २३/०७/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधीतांची त्यांची जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणुक ८३५१ दिनांक ०४/०३/२०१५ अन्वये दि. २७/०२/२०१५ पासुन सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन दिनांक २९/०८/२०१५ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता आस्थापना विभागामार्फत दिनांक २४/०७/२०१५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आलेला असुन त्यास मान्यता मिळुन सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत प्रक्रिया करण्यात येत होती. तथापि संदर्भिय क्र. ११ च्या दिनांक २६/०८/२०१५ रोजीच्या प्राप्त प्रस्तावाच्या मा.स्थायी समितीकडे सद्यस्थितीमध्ये सदरचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला नाही.

सदरचा तपशिल खालील प्रमाणे --------------

| अ. नं. | नांव | पदनाम | दरमहा मानधन | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | मोरे पल्लवी दगडु | लॅब टेक्निशियन | १३,०००/- | २७/०२/२०१५ | २६/०८/२०१५ |

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव हा पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यत सदर आकृतीबंधास मा.शासनाकडून मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेलः

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महि-न्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ता-ने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही -नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही. " असे नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना येथे मा.शासनाच्या निर्देशानुसार शिशु जननी योजना राबविण्यात येत असल्यामुळे कै.बा.दे.दवाखान्यामध्ये रुग्णांच्या संख्येत वाढ झालेली आहे. तसेच रक्तपेढी विभागामार्फत नागरिकांना २४ तास आपातकालीन परिस्थितीमध्ये रक्तपुरवठा करण्यात येत आहे. तसेच फिरता दवाखानामार्फत शहर व उपनगरामध्ये गरीब वस्तीमध्ये रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या सर्व नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातुन अत्यावश्यक बाब असल्यामुळे संदर्भिय प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व रक्तपेढी विभाग व फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स व लॅब टेंक्निशियन या पदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द नेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन कॉलम क्रं. ३ मध्ये दर्शविल्या प्रमाणे त्या दिनांका पासुन पुढील सहा महिन्या करीता करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस व तद्नंतर सदरचा केलेल्या कालावधीतील पुर्ननियुक्तीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत त्याकामी खास बाब म्हणुन निर्णय झाल्यास दरमहा रुपये २,१३,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च १२,७८,००० /- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तांत्रिक खंड नमुद दि.पासुन पुढील सहा महिन्या करीता | तातपुरत्या स्वस्पात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | डॉ. रेणूका प्रणव जोशी | २५/०६/२०१५ | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| २ | डॉ.वैष्णवी मोतीलाल गोपाळघरे | २५/०६/२०१५ | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ३ | डॉ.सुनिता भगवान गाडेकर | २५/०६/२०१५ | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ४ | डॉ. शुभदा बाबासाहेब वाघ (मदने) | २५/०६/२०१५ | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ५ | रेखा रमेश अमोलिक | २५/०६/२०१५ | स्टाफ नर्स | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ६ | निलिमा सतीष हिवाळे | २५/०६/२०१५ | स्टाफ नर्स | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ७ | शिंदे शितल गंगाराम | २५/०६/२०१५ | स्टाफ नर्स | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ८ | शुभांगी अण्णासाहेब काळे | २५/०६/२०१५ | स्टाफ नर्स | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ९ | तृप्ती रावसाहेब बडे | २५/०६/२०१५ | स्टाफ नर्स | ८,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| १० | डॉ.सौरभ अनिल लिमये | २३/०८/२०१५ | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| ११ | डॉ.मनिषा मनोहर गडदे | २३/०८/२०१५ | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| १२ | डॉ. ज्योती लालासाहेब शिंदे ( सोनवणे) | ०२/१०/२०१५ | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | कै.बा.दे.दवा. |
| १३ | डॉ.सुरेश विलास घोलप | १८/०८/२०१५ | वैद्यकीय अधिकारी | २०,०००/- | फिरता दवा. |
| १४ | मोरे पल्लवी दगडु | २९/०८/२०१५ | लॅब टेक्निशियन | १३,०००/- | रक्तपेढी |

वरील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे संबधीतांची कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वस्पात वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स या पदी जा. क्र. आस्थापना करारबध्द नेमणूक ६६७३ दिनांक २३/१२/२०१४ व जा. क्र. आस्थापना करारबध्द नेमणूक ६६७२ दिनांक २३/१२/२०१४ अन्वये अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर केलेल्या आदेशामध्ये अटी क्र. ७ नुसार सदरची करारबध्द नियुक्ती ही मा.पोलीस अधिक्षक यांचे कार्यालयाकडील चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्राच्या अधिन राहुन केलेली आहे. त्यानुसार वरील तक्त्यात दर्शविलेल्यामधील अनु.१,२,३,४,५,६,यांचे मा.पोलिस अधिक्षक यांचे कार्यालयाकडून चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

तथापि वरील तक्त्यामधील अनु.क्र. ७,८,९,चे मा.पोलिस अधिक्षक यांचे कार्यालयाकडून अद्यापपर्यत चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाहीत.

कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेचा विचार करता संबधीतांच्या मानधनावरील करारबध्द नियुक्ती आदेशामध्ये यापुर्वीची पुनश्चः अट समाविष्ट करुन सदरची नियुक्ती ही मा.पोलीस अधिक्षक कार्यालयाकडील चारित्र्य पडताळणी प्रमापत्राच्या अधिन राहुन नियुक्ती द्यावी लागेल.

मा.प्र.मुख्य वैद्यकीय अधिकारी , कै.बा.दे.दवा. व रक्तपेढी विभाग यांचे उपरोक्त संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व रक्तपेढी विभाग व फिरता दवाखाना अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरुपात वैद्यकीय अधिकारी व स्टाफ नर्स व लॅब टेक्निशियन या पदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द नेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन कॉलम क्रं. ३ मध्ये दर्शविल्या प्रमाणे त्या दिनांका पासुन पुढील सहा महिन्या करीता करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करुन तद्‌नंतर सदरच्या केलेल्या कालावधीतील पुर्ननियुक्तीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत निर्णय झाल्यास उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे. /प

तरी उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

सोबत :- सदर कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार मानधनावर
करारबध्द नियुक्ती आदेशा बाबतचा प्रारूप मसूदा

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

यावर प्र.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, मुलेअ

यावर मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, आस्थापना प्रमुख यांनी प्रस्तावीत केले प्रमाणे व सन २०१५-१६ च्या तरतुदीस लक्षात घेवून मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे महाराष्ट्र मनपा अधि. (सुधारित) सन २०११ चे कलम ५३ अ नुसार रिक्त पदाचे अनुषंगाने कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, वरील "प" प्रमाणे आरोग्य सेवा विचारात घेवून यथाप्रस्तावीत मान्यता देणेत येत आहे. तात्काळ मा.स्थायी समिती सभेस कार्योत्तर मान्यतेसाठी सादर करणेत यावा.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---**---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना फिरता दवाखाना व रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, परिचारीका व लॅब टेक्निशियन यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत हा विषय आहे.

मा. श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. कुमार वाकळेः-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना फिरता दवाखाना व रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वैद्यकीय अधिकारी, परिचारीका व लॅब टेक्निशियन यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरीस हि सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- १८ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक या पदावर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता दरमहा मानधन वाढवून दरमहा मानधनावर करारबध्द पुर्निनियुक्ती करणे करीता मंजूरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

संदर्भ :- १. श्री. आशिष रमेश शेलार व इतर यांचा दिनांक ४/६/२०१५ रोजीचा पुर्ननेमणूक होणे बाबतचा विनंती अर्ज

२. श्री. आशिष रमेश शेलार व इतर यांचा दिनांक ०४/०६/२०५ रोजीचा दरमहा मानधन वाढविणे बाबतचा विनंती अर्ज.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की , श्री.आशिष रमेश शेलार व इतर यांनी दिनांक ०४/०६/२०१५ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये " आम्ही पाणी पुरवठा विभागामध्ये करारा नुसार मानधनावर पाणी पुरवठा विभाग येथे तांत्रिक सहाय्यक या पदावर काम करीत आहे. सदर कामासाठी मुदत दि. १२/०८/२०१५ रोजी संपत आहे. तरी आम्हाला या विभागाकडे पुन्हा काम करण्याची इच्छा असुन आम्हाला पुढील मुदतवाढ मिळावी . " असे नमुद करुन विनंती केलेली आहे.

तसेच श्री.आशिष रमेश शेलार व इतर यांनी दिनांक ०४/०६/२०१५ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये " आम्ही पाणी पुरवठा विभागामध्ये करारा नुसार मानधनावर पाणी पुरवठा विभाग येथे तांत्रिक सहाय्यक या पदावर काम करीत आहे.आम्हाला सदर कामी मासिक वेतनवाढ रु.१०,०००/- इतके देण्यात येते.परंतु कुंटुबाचा उदरनिर्वाह करणेस सदरचे वेतन पुरेशे होत नाही.तरी विनंती करण्यात येते की , आम्हाला मासिक वेतनवाढ रु.१५,०००/- इतके मिळावे . " असे नमुद करुन विनंती केलेली आहे.

यापुर्वी मा.सभापती , स्थायी समिती यांचेशी दिनांक ०७/०८/२०१४ रोजी झालेली समक्ष चर्चा व श्री कोहक दिपक व इतर यांचा दिनांक ०७/०८/२०१४ रोजीचा अर्जाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व तांत्रिक सहाय्यक या पदी संबधीतांची यापुर्वी केलेल्या सहा महिन्याच्या मानधनावरील करारबध्द नेमणूकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील तीन महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननेमणुकीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदीनुसार मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे इकडील जा.क्र. आस्था. वर्क . १६६ दिनांक १०/०९/२०१४ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १२५ दिनांक १६/१२/२०१४ अन्वये ठराव पारीत करुन संबधितांची पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व तांत्रिक सहाय्यक या पदी त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील तीन ऐवजी सहा महिन्या करीता अटी व शर्ती नुसार प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननेमणुकीस मान्यता दिलेली होती .

सदर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १२५ दिनांक १६/१२/२०१४ अन्वयेच्या पारीत ठरावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व तांत्रिक सहाय्यक या पदी खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे संबधीतांची जा.क्र.आस्था.करारबध्द ७७८६ दि.९/२/२०१५ अन्वये सहा महिन्या करीता नमुद दरमहा मानधनावर पाणी पुरवठा विभागामध्ये अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननेमणूक करण्यात आलेली असुन त्याबाबतचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोहक दिपक रामचंद्र | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | १०/०२/२०१५ | ९/८/२०१५ |
| २ | लुंकड महावीर सुनिल | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | १०/०२/२०१५ | ९/८/२०१५ |
| ३ | पाठक विशाल दिलिप | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | १०/०२/२०१५ | ९/८/२०१५ |
| ४ | भालेराव संतोष छबु | तांत्रिक सहाय्यक | १०,०००/- | १०/०२/२०१५ | ९/८/२०१५ |
| ५ | आशिष रमेश शेलार | तांत्रिक सहाय्यक | १०,०००/ | १०/०२/२०१५ | ९/८/२०१५ |
| ६ | सागर मनोहर उबाळे | तांत्रिक सहाय्यक | १०,०००/ | १०/०२/२०१५ | ९/८/२०१५ |
| ७ | खान इम्रान आयुब | तांत्रिक सहाय्यक | १०,०००/ | १०/०२/२०१५ | ९/८/२०१५ |
| ८ | जैसवाल राजेंद्र रामआसरे | तांत्रिक सहाय्यक | १०,०००/ | १०/०२/२०१५ | ९/८/२०१५ |

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर पाणी पुरवठा विभागा करीता मॅकेनिकल इंजि. १ पद संख्या मंजुर असुन तांत्रिक सहाय्यक असे पदनाम मंजुर नाही.

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव हा पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यंत सदर आकृतीबंधास मा.शासनाकडून मंजुरी मिळालेली नाही.

तसेच श्री.आशिष रमेश शेलार व इतर यांनी दिनांक ०४/०६/२०१५ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये आम्ही पाणी पुरवठा विभागामध्ये करारा नुसार मानधनावर पाणी पुरवठा विभाग येथे तांत्रिक सहाय्यक या पदावर काम करीत आहे. आम्हाला सदर कामी मासिक वेतनवाढ रु.१०,०००/- इतके देण्यात येते. परंतु कुंटुबाचा उदनिर्वाह करणेस सदरचे वेतन पुरेशे होत नाही.तरी विनंती करण्यात येते की , आम्हाला मासिक वेतनवाढ रु.१५,०००/- इतके मिळावे असे नमुद करुन विनंती केलेली आहे.तथापि सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने सदरचा मानधन वाढी बाबतचा विषय हा आर्थिक खर्चा बाबतचा धोरणात्मक विषय असल्याने या बाबत मा.स्थायी समितीच्या बैठकीमध्ये चर्चा विनियम होवुन निर्णय होणे उचित वाटते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही . " असे नमुद केलेले आहे.

यापुर्वी पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) व तांत्रिक सहाय्यक या पदी वरील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे संबधीतांची जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणुक ७७८६ दिनांक ०९/०२/२०१५ अन्वये सहा महिन्या करीता नमुद केलेल्या दरमहा मानधनावर पाणी पुरवठा विभागामध्ये अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्नेनेमणूक करण्यात आलेली असुन त्यापैकी अनु क्रं. १ , २ , ३ हे कनिष्ठ अभियंता (सिव्हील) सदर कार्यालयीन आदेशा नुसार सद्यस्थितीमध्ये पाणी पुरवठा विभागामध्ये रुजु झालेले नाहीत.

अहमदनगर महानगरपालिकेमार्फत मा. केंद्र सरकार व मा. महाराष्ट्र राज्य सरकार यांचे कडील विविध अनुदानाद्वारे शहर व उपनगरामध्ये फेज - २ अंतर्गत नव्याने पाईपलाईन टाकणेचे कामे प्रस्तावित असुन नागरिकांच्या पाणी पुरवठा वितरणाच्या दृष्टीकोनातुन अंत्यत अत्यावश्यक बाब असल्यामुळे खास बाब म्हणुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरीने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरुपात तांत्रिक सहाय्यक या पदी खालील तक्त्यात

दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्नेनेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्या करीता करारा नुसार यापुर्वीच्या रुपये १०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी म्हणुन निर्णय झाल्यास त्याकामी दरमहा रुपये ५०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ३,००,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | भालेराव संतोष छबु | तांत्रिक सहाय्यक | पाणी पुरवठा विभाग |
| २ | आशिष रमेश शेलार | तांत्रिक सहाय्यक | पाणी पुरवठा विभाग |
| ३ | सागर मनोहर उबाळे | तांत्रिक सहाय्यक | पाणी पुरवठा विभाग |
| ४ | खान इम्रान आयुब | तांत्रिक सहाय्यक | पाणी पुरवठा विभाग |
| ५ | जैसवाल राजेंद्र रामआसरे | तांत्रिक सहाय्यक | पाणी पुरवठा विभाग |

श्री. आशिष रमेश शेलार व इतर यांचा दि. ०४/०६/२०१५ रोजीच्या अर्जाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात तांत्रिक सहाय्यक या पदांवर वरील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सहा महिन्या करीता केलेल्या करारबध्द मानधनावरील करारबध्द नेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे त्यांचे संदर्भिय अर्जाच्या अनुषंगाने दरमहा मानधन वाढविणे बाबतचा निर्णय होवून मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णया करीता मा. स्थायी समितीकडे पाठविणे बाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे

यावर प्र.सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय कि,प्रस्तावानुसार मा.मुलेअ व मा.मुलेप यांचा अभिप्राय घेणे योग्य,आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाअधिक्षक यांचा अभिप्राय कि,प्रस्तावित केल्याप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय कि,प्रस्तावाप्रमाणे पाणी पुरवठा विभागाकरिता क अ व तांत्रिक सहाय्यक घेणे कामी मा.शासन,वित्तविभाग शासन परिपत्रक क्र.पदनि २०१०/८४/१०/विसु -१ मुंबई दिनांक २७/९/२०१० चे परिपत्रक व शासन निर्णय क्रमांक :क्र पदनि२०१३/प्र.क्र.११/१३विसु-१ मुंबई दिनांक २/२/२०१३मधील मार्गदर्शन सुचनाप्रमाणे कार्यवाहीकरणे उचित होईल असे मत आहे.तथापि प्रस्तावाप्रमाणे मानधन वाढ व नियुक्तीबाबत निर्णयाकरिता मा.स्थायी समिती समोर ठेवणेस हरकत नाही./K/अ

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय कि, K निर्णयार्थ

यावर मा.आयुक्त यांचा अभिप्राय कि,अ नुसार मान्य.

००००

फेरसादर,

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक या पदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधन वाढवून दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र. आस्था. ४३ दि.२६/६/२०१५ अन्वये मा.स्थायी समिती कडे पाठविण्यात आलेला होता.

तथापि सदर बाबत मा.नगरसचिव यांनी त्यांचेकडील जा.क्र. व नगरसचिव विभाग १२७ दिनांक २८/८/२०१५ अन्वये " महानगरपालिका प्रशासनामार्फत दिनांक २६/६/२०१५ रोजी अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक या पदावर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधन वाढवुन दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे करीता मंजुरी बाबतचा ऑफिस रिपोर्ट बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेसाठी तथा निर्णयासाठी दाखल केला होता. तथापि सदर प्रस्तावास १५ दिवस पेक्षा जास्त कालावधी झालेला आहे आणि याबाबत मा.स्थायी समिती सभेचा निर्णय झाला नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रशासनाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी परत पाठविण्यात येत आहे. असे नमुद करून कळविलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" प्रकरण २ मधील ३ (के) मध्ये जेथे आयुक्तांच्या कोणत्याही प्रस्तावास , या अधिनियमाच्या तरतुदीन्वये घटीत करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या मंजुरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत , समिती, नगरपालिका सचिवांकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर समितीच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, असा कोणत्याही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील- मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो - तसे न केल्यास, अशा प्रस्तावाला समितीने मंजुरी किंवा मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येईल, आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्ताकडून महानगरपालिकेला पाठविण्यात येईल." असे नमुद निर्देशित केलेले आहे.

वरील नगरसचिव विभागाचे दि.२८/८/२०१५ रोजीचे पत्र पाहता व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूची 'ड' प्रकरण २ मधील ३(के) मधील तरतुद पाहता आस्थापना विभागाने दिनांक २६/६/२०१५ रोजी मा.स्थायी समितीकडे सादर केलेल्या प्रस्तावास लगतच्या झालेल्या स्थायी समिती पासून ४५ दिवस झाले किंवा कसे याबाबत बोध होत नसल्यामुळे सदर बाबत नगरसचिव कार्यालयाने कळवुन पुढील कार्यवाही नगरसचिव विभागाने करणे आवश्यक आहे.

तरी त्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूची 'ड' प्रकरण २ चे ३(के) मधील तरतुदीचा विचार करून सदरच्या प्रस्तावावर नगरसचिव विभागामार्फत योग्य तो निर्णय होणे उचित असल्याने सदरचा प्रस्ताव नगरसचिव विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर असे

यावर प्र. सहा. आयुक्त यांचा सहमती दर्शक सही

यावर मा. उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक या पदावर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता दरमहा मानधन वाढवून दरमहा मानधनावर करारबध्द पुर्निनियुक्ती करणे करीता मंजूरी बाबतचा विषय आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला

मा.सभापती साहेब :- सहाय्यक तांत्रिक काय काम करता किती लोक घ्यायचे आहेत.

इंजि. श्री. सोनटक्के :- ५ लोक घ्यावयाचे आहेत.स्कीमवरचे लोक तांत्रिक नाही . १० हजार पेमेंट आहे फेज-२ सुपरव्हिजनसाठी हे कर्मचारी नेमणे आहेत.

मा.उपायुक्त (सा.):- आपल्या वतीने सुपरव्हिजन करतात.त्या ठिकाणी दुसरे टेक्नीकल कर्मचारी नाही.

मा.सभापती साहेब :- या आधी किती इंजिनीयर घेतले आहे

श्री. सोनटक्के इंजि.:- मागच्या आठवडयात ६ इंजि. जॉईन झाले २ पुरूष, ४ महिला आहेत. चार दिवस झाले आहेत.

मा.श्री. दिप चव्हाण :- महिलांना साईट वर्क वर पाठवता का ?

श्री. काकडे इंजि. :- आठ दिवस माहिती घ्यायचे सांगितले आहे नंतर साईटवर पाठविण्यात येईल.

मा.सभापती साहेब :- या तांत्रिक सहाय्यक कामगारांची आवश्यकता आहे काय.

श्री. सोनटक्के इंजि.:- होय आवश्यकता आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- १२ पद इंजि. रिक्त आहे. कॉन्ट्रॅक्ट बेसीवर घेतो.ज्या पात्र उमेवारांची निवड केली ते फक्त पाणी पुरवठाकरिता घेतलेले नाही. महिलाना इतर विभागाकडे पाठविता येईल जर त्या काम करू शकल्या नाहीत तर ईतरांना पाणीपुरवठा विभागाकडे देण्यात येईल.

मा.श्री. कुमार वाकळे :- प्रस्तावा नुसार पुर्ननियुक्ती करण्यात यावी. परंतु मानधन वाढीचा प्रस्ताव स्वतंत्र्य सादर करावा.

मा.श्री. संपत बारस्कर:- प्रस्तावा प्रमाणे पुर्ननियुक्ती दया. मानधन वाढी चा स्वतंत्र्य प्रस्ताव पुढच्या सभेत ठेवण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- पुर्ननियुक्ती करणे बाबत चा विषय मंजूर करण्यात यावा.परंतू मानधन वाढी बाबत चा स्वतंत्र्य प्रस्ताव करून पुढील सभेत ठेवा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्ट प्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक या पदावर तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्निनियुक्ती करणे करीता हि सभा मान्यता देत आहे. तथापी मानधन वाढी बाबत स्वतंत्र्य प्रस्ताव सादर करण्यात यावा.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- १९ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ : **इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांचेकडील जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग २५५ दिनांक २७ /०८ /१५ अन्वयेचा प्रस्ताव.**

उपरोक्त संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्यात येतो की , इलेक्ट्रीक विभाग प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग २५५ दिनांक २७ /०८ / २०१५ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " आस्थापना जा.क्र.२७२ दिनांक १६/०४/२०१५ च्या कार्यालयीन आदेशा प्रमाणे खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे वायरमन कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेले आहे.

| अ.नं. | कर्मचा-याचे नांव | पदनाम (मानधनावरील) |
|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन |
| ३ | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन |
| ४ | देवरे गितेश आण्णासाहेब | वायरमन |
| ५ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन |
| ६ | डहाळे सौरभ भाऊसाहेब | वायरमन |
| ७ | महारपुडे कैलास भाउसाहेब | वायरमन |

तरी संबधीत मानधनावरील वायरमन यांची दि.१६/१०/२०१५ रोजी कालावधी संपत आहे. सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती बैठक झालेली नाही. इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवा असल्याने नागरीकांचा दिवसेदिवस तक्रारी वाढत आहे.इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेची बाब विचारात घेवुन तसेच गणेश उत्सव , नवरात्र उत्सव व इतर धार्मिक उत्सव असल्याने तक्त्यात दर्शविलेल्या संबधीतांची त्यांची मुदत संपल्यानंतर तीन दिवस तांत्रिक खंड देवुन दिनांक २०/१०/२०१५ पासुन ६ महिन्यासाठी पुर्ननियुक्ती देवुन तद्नंतर मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी घेणे उचीत वाटते.त्यानुसार वरील मानधनावरील कर्मचा-याची नियमानुसार नियुक्ती करणेस आस्थापना विभागास आदेश होणे बाबत." नमुद करुन निर्देशित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये इलेक्ट्रीक विभाग प्रमुख त्यांचे कडील दिनांक ०२ / ०२ / २०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधीतांची सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा यापुर्वी जा.क्र.आस्था.वर्क. ३८४ दिनांक २५/३/२०१५ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.

सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १४८ दिनांक ३०/३/२०१५ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला होता.

"ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात ऑफिस रिपोर्टमध्ये नमुद केलेल्या वायरमन यापदी १) सुभाष बापुराव सुळ २) लोंढे नवनाथ बाळासाहेब ३) महारपुडे कैलास भाऊसाहेब ४) इकबाल सुलेमान सय्यद ५) देवरे गितेश आण्णासाहेब ६) काटकर लंकेश तुकाराम ७) डहाळे सौरभ भाऊसाहेब यांना तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यास ऑफिस रिपोर्टानुसार पुर्व मंजुरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर, खर्च मंजुर.

तसेच हे कर्मचारी शहराला उपयुक्त काम करतात.त्यांनी मानधन वाढवुन रु.१०,०००/- करण्याकरीता मा.सभापती , स्थायी समितीकडे दिलेल्या दिनांक २७/०३/२०१५ रोजीच्या अर्जाचा विचार करता या ठरावाद्वारे दिल्या जाणा-या नियुक्ती पासुन मानधनात वाढ करुन मानधन रु ९,५००/- दरमहा इतके करण्यात यावे.नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी."

उपरोक्त मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १४८ दिनांक ३०/३/२०१५ अन्वयेच्या पारीत ठरावाच्या अनुषंगाने खालील तक्त्यात दर्शविल्या संबधीतांची इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी जा.क्र.आस्थापना करारबध्द नेमणूक २७२ दिनांक १६/०४/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक १७/०४/२०१५ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रु ९,५००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर वरील संबधीतांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक २७२ दिनांक १६/०४/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक १७/०४/२०१५ पासुन पुढील सहा महिन्या करीता केलेल्या कालावधीतील करारबध्द मानधनावरील पुर्नेनेमणूकीची मुदत ही दिनांक १६ / १० / २०१५ रोजी समाप्त होणार आहे.

उपरोक्त मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १४८ दिनांक ३०/३/२०१५ अन्वयेच्या पारीत ठरावाच्या अनुषंगाने खालील तक्त्यात दर्शविल्या संबधीतांची इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी जा.क्र.आस्थापना करारबध्द नेमणूक २७२ दिनांक १६/०४/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक १७/०४/२०१५ पासुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे रु ९,५००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदर बाबत तपशिल खालील प्रमाणे आहे. --------------

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | नियुक्ती दिनांक | मुदत समाप्त दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष बापुराव सुळ | वायरमन | ९,५००/- | १७/०४/२०१५ | १६/१०/२०१५ |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | वायरमन | ९,५००/ | १७/०४/२०१५ | १६/१०/२०१५ |
| ३ | महारपुडे कैलास भाउसाहेब | वायरमन | ९,५००/ | १७/०४/२०१५ | १६/१०/२०१५ |
| ४ | इकबाल सुलेमान सय्यद | वायरमन | ९,५००/ | १७/०४/२०१५ | १६/१०/२०१५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | देवरे गितेश आण्णासाहेब | वायरमन | ९,५००/ | १७/०४/२०१५ | १६/१०/२०१५ |
| ६ | काटकर लंकेश तुकाराम | वायरमन | ९,५००/ | १७/०४/२०१५ | १६/१०/२०१५ |
| ७ | डहाळे सौरभ भाऊसाहेब | वायरमन | ९,५००/ | १७/०४/२०१५ | १६/१०/२०१५ |

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव हा पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यत सदर आकृतीबंधास मा.शासनाकडून मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महि-न्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ता-ने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी-मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही -नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही. " असे नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये आस्थापना कायम सुचीवर वायरमन यापदांची संख्या अत्यंत कमी प्रमाणात मंजुर आहेत. त्यामुळे इलेक्ट्रीक विभागाकडील दैनंदिन कामकाजामध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होत असुन त्याबाबत नागरीकांच्या मा. पदाधिकारी व मा. नगरसेवक यांचे दिवसेदिवस तक्रारी वाढत आहेत. इलेक्ट्रीक विभाग सर्व नागरिकांच्या दृष्टीकोनातुन अत्यावश्यक बाब असल्यामुळे संदर्भिय प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदी खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द नेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन कॉलम क्रं. ३ मध्ये दर्शविल्या प्रमाणे त्या दिनांका पासुन पुढील सहा महिन्या करीता करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस व तद्नंतर सदरच्या केलेल्या कालावधीतील पुर्ननियुक्तीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत त्याकामी खास बाब म्हणुन निर्णय झाल्यास दरमहा रुपये ६६,५००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च ३,९९,००० /- इतका खर्च अपेक्षित होईल.

| अ. नं. | नांव | तांत्रिक खंड देवुन नमुद दि.पासुन पुढील सहा महिन्या करीता | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सुभाष बापुराव सुळ | २०/१०/२०१५ | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रीक विभाग |
| २ | लोंढे नवनाथ बाळासाहेब | २०/१०/२०१५ | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रीक विभाग |
| ३ | महारपुडे कैलास भाउसाहेब | २०/१०/२०१५ | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रीक विभाग |
| ४ | इकबाल सुलेमान सय्यद | २०/१०/२०१५ | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रीक विभाग |
| ५ | देवरे गितेश आण्णासाहेब | २०/१०/२०१५ | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रीक विभाग |
| ६ | काटकर लंकेश तुकाराम | २०/१०/२०१५ | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रीक विभाग |
| ७ | डहाळे सौरभ भाऊसाहेब | २०/१०/२०१५ | वायरमन | ९,५००/- | इलेक्ट्रीक विभाग |

इलेक्ट्रीक विभाग यांचे उपरोक्त संदर्भिय प्रस्तावाच्या अनुषंगाने इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेकरीता तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदी वरील तक्त्यात दर्शविलेल्या संबधितांची त्यांची सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द नेमणुकीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन कॉलम क्रं. ३ मध्ये दर्शविल्या प्रमाणे त्या दिनांका पासुन पुढील सहा महिन्या करीता करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे नमुद केलेल्या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करुन तद्नंतर सदरच्या केलेल्या कालावधीतील पुर्ननियुक्तीस मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत निर्णय झाल्यास उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर

सोबत :- सदर कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार मानधनावर
करारबध्द नियुक्ती आदेशा बाबतचा प्रारूप मसूदा

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

यावर प्र.सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, मुलेअ

यावर मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीतानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे रिक्त पदाचे अनुषंगाने महाराष्ट्र मनपा अधि. (सुधारित) २०११ चे कलम ५३ (३) प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक ठरते.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, मुलेप यांच्या अहवालाशी सहमत आहे मान्यतेस्तव

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---****---

**चर्चा :--**

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा हा विषय आहे.

मा. श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. कुमार वाकळे:-ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे दिनांक २०/१०/२०१५ पासून सहा महिन्या करीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती पुर्व मंजुरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २० बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री,जोडारी या पदांचे दरमहा मानधन वाढविणे बाबत चा ऑफिस रिपोर्ट.
**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग.

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की , संदिप प्रभाकर पुंड व इतर यांनी दि. ०६/०५/ २०१५ रोजी अर्ज देवुन त्यामध्ये " आम्ही खालील कर्मचारी वरील विषयास अनुसरुन कारणे विनंती अर्ज सादर करतो की , आम्ही आपल्या पाणी पुरवठा विभागात गेल्या ५ वर्षापासुन कंत्राटी करार नियुक्ती अंतर्गत काम करीत आहेत सदर कालावधी मध्ये आम्हाला दरमहा ७५००/- मानधन देण्यात येते व सदर मानधन या मधुन १०% आयकर कपात करण्यात येते . त्यामुळे आम्हास रु. ६७५०/- एकुण मानधन देण्यात येते . तरी सदर मानधन यामध्ये कुटुंबाचा खर्च भागविणे अवघड होत असुन आम्हाला इतर कुठल्याही सोय सुविधा दिल्या जात नाहीत . त्यामुळे आम्हास रु १२०००/- इतके मानधन मिळावेत ." असे नमुद करुन विनंती केलेली आहे.

तसेच मा.मॅके.इंजि., पाणी पुरवठा विभाग प्रमुख , यांनी त्यांचे कडील जा.क्र.पाणी पुरवठा विभाग १४१ दि. ०६/०५/२०१५ अन्वये पत्र देवुन सदरचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी इकडेस पाठविण्यात आलेला आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेचा विचार करता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक , विजतंत्री व जोडारी या पदी अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबत वर्तमान पत्रामध्ये वेळोवेळी जाहिराती प्रसिध्दीस देवुन मा. निवड समिती मार्फत उमेदवारांच्या थेट पध्दतीने मुलाखती घेवुन निवड करुन संबधितांची मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली होती. तद्नंतर मा. मॅकेनिकल इंजि. पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे आवश्यकते नुसार संबधीतांची मा. स्थायी समितीची मान्यता घेवून दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे त्यांना तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता वेळोवेळी करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवे करीता करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक , विजतंत्री व जोडारी या पदी अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर संबधीतांची करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन त्याबाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | नांव | पदनाम | विभाग | जा.क्र.आस्था करारबध्द नेमणूक | सद्यस्थती मधील नियुक्ती कालावधी | दरमहा मानधन रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | महेश बाळासाहेब कुळधर | पंपचालक | पा.पु. | ८५२० दि.११/३/२०१५ | ३/२/२०१५ ते २/८/२०१५ | ७,५००/- |
| २ | मनिष कैलास सोनवणे | पंपचालक | पा.पु. | ८५२० दि.११/३/२०१५ | ३/२/२०१५ ते २/८/२०१५ | ७,५००/- |
| ३ | राकेश गोरक्षनाथ तेलोरे | पंपचालक | पा.पु. | ८५२० दि.११/३/२०१५ | ३/२/२०१५ ते २/८/२०१५ | ७,५००/- |
| ४ | खान जावेद रफिक | विजतंत्री | पा.पु. | ८५२० दि.११/३/२०१५ | ३/२/२०१५ ते २/८/२०१५ | ७,५००/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | प्रसाद मुरलीधर हातवळणे | विजतंत्री | पा.पु. | ८५२० दि.११/३/२०१५ | ३/२/२०१५ ते २/८/२०१५ | ७,५००/- |
| ६ | सागर आसाराम खताडे | विजतंत्री | पा.पु. | ८८२७ दि.२७/३/२०१५ | ३०/३/२०१५ ते २९/९/२०१५ | ७,५००/- |
| ७ | नितीन किशोर हुशारे | विजतंत्री | पा.पु. | ८८२७ दि.२७/३/२०१५ | ३०/३/२०१५ ते २९/९/२०१५ | ७,५००/- |
| ८ | नागापुरे संजय हिरामण | पंपचालक | पा.पु. | ८८२७ दि.२७/३/२०१५ | ३०/३/२०१५ ते २९/९/२०१५ | ७,५००/- |
| ९ | साळवे शरद मल्हारी | पंपचालक | पा.पु. | ८८२७ दि.२७/३/२०१५ | ३०/३/२०१५ ते २९/९/२०१५ | ७,५००/- |
| १० | पुंड संदिप प्रभाकर | पंपचालक | पा.पु. | ८८२७ दि.२७/३/२०१५ | ३०/३/२०१५ ते २९/९/२०१५ | ७,५००/- |
| ११ | तांबे गौतम भास्कर | पंपचालक | पा.पु. | ८८२७ दि.२७/३/२०१५ | ३०/३/२०१५ ते २९/९/२०१५ | ७,५००/- |
| १२ | नितीन अन्नासाहेब मुरकुटे | जोडरी | पा.पु. | ८८२७ दि.२७/३/२०१५ | ३०/३/२०१५ ते २९/९/२०१५ | ७,५००/- |

यापुर्वी मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १४९ दिनांक २३/१०/२०१३ अन्वयेच्या पारीत ठरावाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक , जोडारी , विजतंत्री या पदांवर करारबध्द केलेल्या नियुक्तीचे सद्यस्थितीमध्ये मानधन रु .६,०००/- वरुन रु. ७,५००/- इतके देण्यात येत आहे.

तसेच यापुर्वी इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात वायरमन या पदी अटी व शर्तीनुसार मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतचा प्रस्ताव निर्णया करीता इकडील जा.क्र. आस्थापना वर्क. ३८४ दिनांक २५ / ३ / २०१५ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता. सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा. स्थायी समिती ठराव क्रं. १४८ दिनांक ३० / ३ / २०१५ अन्वये ठराव पारीत करुन मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येवुन सदरचे दरमहा रु. ७,५००/- वरुन रु. ९,५००/- इतके दरमहा मानधन देणे बाबतचा ठराव पारीत करण्यात आलेला आहे. व त्यानुसार इलेक्ट्रीक विभागासाठी करारा नुसार संबधीतांची तात्पुरत्या स्वरुपात वायरमन यापदी दरमहा रु ९,५००/- इतके मानधन देण्यात येवुन करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

संदर्भिय अर्जाच्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक , जोडारी , विजतंत्री यापदी करारा नुसार अटी व शर्तीनुसार करारबध्द नियुक्ती बाबत दरमहा मानधन अदा बाबतची माहिती पुढील प्रमाणे ....

| अ. नं. | तात्पुरत्या स्वरुपात पदाचे नांव | सद्यस्थितीमध्ये देण्यात येणारे मानधन | अर्जामध्ये नमुद मागणी मानधन रु | मा.स्था.स.ठ.क्र. १४८ दि. ३०/३/२०१५ अन्वयेच्या ठरावाच्या अनुषंगाने प्रस्तावित मानधन रक्कम रु |
|---|---|---|---|---|
| १ | पंपचालक | ७,५००/- | १२,०००/- | ९,५००/- |
| २ | जोडारी | ७,५००/- | १२,०००/- | ९,५००/- |
| ३ | विजतंत्री | ७,५००/- | १२,०००/- | ९,५००/- |

उपरोक्त संबधीतांच्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात पंपचालक , जोडारी , विजतंत्री या पदांचे दरमहा मानधन वाढी बाबतचा विषय हा दरमहा होणारा आर्थिक खर्च व धोरणात्मक स्वरुपाची बाब असल्याने मा.स्थायी समितीमध्ये या बाबत चर्चा विनियम होवून निर्णय होणे उचित असल्याने सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे निर्णया करीता पाठविणे आवश्यक वाटते.

तरी उपरोक्त प्रकरणी मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा याबाबत अभिप्राय होवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरी करिता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्रभारी सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मा.स्थायी समिति पुढे सादर करणे योग्य , तथापी मा.मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेणे योग्य, आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांची स्वाक्षरी.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मानधन वाढ करणे धोरणात्मक स्वरुपाची बाब असल्यामुळे निर्णयाकरीता मा.स्थायी समितीसमोर ठेवणेस हरकत नाही. अ/

यावर मा.उपायुक्त (सा) यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अ नुसार मान्य.

oooooo

फेरसादर,

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री, जोडारी या पदांचे दरमहा मानधन वाढविणे बाबत मा.स्थायी समितीची मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र.आस्था.४२ दि.२६/६/२०१५ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.

तथापि सदर बाबत मा.नगरसचिव यांनी त्यांचेकडील जा.क्र. व नगरसचिव विभाग १२६ दिनांक २८/८/२०१५ अन्वये " महानगरपालिका प्रशासनामार्फत दिनांक २६/६/२०१५ रोजी अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक, विजतंत्री, जोडारी या पदांचे दरमहा मानधन वाढविणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिति सभेच्या मान्यतेसाठी तथा निर्णयासाठी दाखल केला होता. तथापि सदर प्रस्तावास १५ दिवस पेक्षा जास्त कालावधी झालेला आहे आणि याबाबत मा.स्थायी समिती सभेचा निर्णय झाला नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रशासनाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी परत पाठविण्यात येत आहे. असे नमुद करून कळविलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" प्रकरण २ मधील ३ (के) मध्ये जेथे आयुक्तांच्या कोणत्याही प्रस्तावास , या अधिनियमाच्या तरतुदीन्वये घटीत करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या मंजुरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत , समिती, नगरपालिका सचिवांकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर समितीच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, असा कोणत्याही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील- मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो - तसे न केल्यास, अशा प्रस्तावाला समितीने मंजुरी किंवा मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येईल, आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्ताकडून महानगरपालिकेला पाठविण्यात येईल." असे नमुद निर्देशित केलेले आहे.

वरील नगरसचिव विभागाचे दि.२८/८/२०१५ रोजीचे पत्र पाहता व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूची 'ड' प्रकरण २ मधील ३(के) मधील तरतुद पाहता आस्थापना विभागाने दिनांक २६/६/२०१५ रोजी मा.स्थायी समितीकडे सादर केलेल्या प्रस्तावास लगतच्या झालेल्या स्थायी समिती पासून ४५ दिवस झाले किंवा कसे याबाबत बोध होत नसल्यामुळे सदर बाबत नगरसचिव कार्यालयाने कळवुन पुढील कार्यवाही नगरसचिव विभागाने करणे आवश्यक आहे.

तरी त्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूची 'ड' प्रकरण २ चे ३(के) मधील तरतुदीचा विचार करून सदरच्या प्रस्तावावर नगरसचिव विभागामार्फत योग्य तो निर्णय होणे उचित असल्याने सदरचा प्रस्ताव नगरसचिव विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर असे

यावर प्र. सहा. आयुक्त यांचा सहमती दर्शक सही

यावर मा. उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती :- अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री,जोडारी या पदांचे दरमहा मानधन वाढविणे बाबत चा विषय आहे.

मा.श्री.कुमार वाकळै :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे सभेमध्ये ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. दिप चव्हाण :- कशासाठी मानधन वाढवावयाचे आहे.

आस्थापना प्रमुख श्री.सोनवणे :- रूपये ७५००/- हजार रूपये दरमहा मानधन आहे.मानधनामधून १० टक्के आयकर कपात करण्यात येते. त्या मुळे रूपये ९५००/- करणे बाबत मागणी केली आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- पुर्वी किती लोक होते.

इंजि. श्री. सोनटक्के :- मुळानगर ते वसंत टेकडी दरम्यानची जी यंत्रणा आहे त्यावर कर्मचारी १११ कर्मचारी कार्यरत होते. त्यापैकि ६१ कर्मचारी रिटायर्ड झाले. त्यामध्ये ९ पंपचालक व ६ इलेट्रीशयन रिटायर्ड झाले.या करीता ७ पंपचालक व ४ इलेक्ट्रीशीयान यांचा प्रस्ताव ठेवला आहे.

मा.सभापती साहेब :- एकदा स्थायी समिती सदस्यांनी व्हिजीट करावी १२ लोक आहेत त्यास मंजुरी देण्यांत यावी.मागील मानधनाच्या रकमेत रूपये १५००/- वाढ करून रू. ९ हजार मानधन करण्यात यावे.

मा.संपत बारस्कर :- दरमहा मानधन रूपये १५००/- वाढ करण्यात यावी.

मा.श्री. कुमार वाकळेः- दरमहा मानधन रूपये ९०००/-  करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- मानधन वाढ  सर्वानुमते मंजूर करण्यात यावा. .

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरूपात पंपचालक,विजतंत्री,जोडारी या पदांचे  दरमहा मानधन रक्कम रूपये ७५००/- मध्ये रूपये १५००/- वाढ करून ९०००/- करणेस  हि सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे      सही /-

अनुमोदक :- मा.संपत बारस्कर     सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २१ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) यापदी नंदकिशोर विठठल जाधव यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की , मा.प्र. शहर अभियंता , बांधकाम विभाग प्रमुख यांनी त्यांचे कडील जा.क्र.बांधकाम विभाग ३९१ दिनांक ०१/६/२०१५ अन्वये पत्र सादर करुन त्यामध्ये "सार्व. बांधकाम विभागाकडे संदर्भिय पत्र क्र. १ नुसार एकुण ४ कंत्राटी अभियंत्यांची नेमणूक करण्यात आली होती , त्यापैकी सिध्दांत पवार , यांनी यापुर्वीच राजीनामा दिला असुन उर्वरीत ३ कंत्राटी अभियंत्यांची मुदत दि. २७/५/२०१५ रोजी संपलेली आहे. सदर अभियंत्यांपैकी श्री.जाधव यांनी इकडेस अर्ज देवुन काम करण्यास इच्छुक असुन पुढील ६ महिन्यासाठी काम करण्याची संधी मिळणे बाबत कळविले आहे. श्री.जाधव,यांचे बांधकाम विभागाकडील काम समाधानकारक आहे. याबाबत आपले स्तरावरुन नियमानुसार उचित कार्यवाही व्हावी. तरी सार्व. बांधकाम विभागाकडील कंत्राटी अभियंत्याचे रिक्त जागेवर अभियंत्याची नेमणूक त्वरीत करणे बाबत कार्यवाही व्हावी." असे नमुद करुन सुचीत केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये सिव्हील इंजिनियर , बांधकाम विभाग यांचे कडील सार्व . बांधकाम विभाग जा. क्र.१७३५दिनांक२१/०२/२०१४अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे दरमहा मानधनावर करारबध्द नियुक्ती करीता दिनांक ३१ / १०/२०१४ रोजीच्या दैनिक सार्वमत व दिनांक ३/११/२०१४ रोजीच्या दैनिक नवा मराठा या वर्तमान पत्रामध्ये जाहिराती प्रसिध्दीस देवुन दिनांक १५/११/२०१४ रोजी उमेदवारांच्या थेट पध्दतीने **(Walk In Interview)** नुसार मुलाखती आयोजित करण्यात आलेल्या होत्या.

सदर प्रसिध्द जाहिरातीच्या अनुषंगाने दिनांक १५/११/२०१४ रोजी मा.आयुक्त तथा अध्यक्ष , निवड समिती , अहमदनगर महानगरपालिका यांचे अध्यक्षते खाली मा. निवड समिती सदस्य यांनी उपस्थित उमेदवारांचे थेट पध्दतीने मुलाखती घेवुन पात्र ठरवुन निवड केलेली होती.

त्यानुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेच्या बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी अटी व शर्ती प्रमाणे खालील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे संबधीतांची जा.क्र.आस्थापना करारबध्द नेमणूक ६०७३ दिनांक २८/११/२०१४ अन्वये सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर बांधकाम विभागामध्ये करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | रुपाली रमेश केकान | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | बांधकाम विभाग |
| २ | सिध्दांत बजरंग पवार | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | बांधकाम विभाग |
| ३ | आस्मा बाबा इनामदार | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | बांधकाम विभाग |
| ४ | नंदकिशोर विठठल जाधव | कनिष्ठ अभियंता (सिव्हील) | २०,०००/- | बांधकाम विभाग |

सदर वरील संबधीतांची करारा नुसार सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील नेमणुकीची मुदत ही दिनांक २७/५/२०१५ रोजी समाप्त झालेली आहे.

मा.प्र.शहर अभियंता ,बांधकाम विभाग प्रमुख यांचे कडील उपरोक्त संदर्भिय जा.क्र.बांधकाम विभाग ३९१ दि.०१/६/२०१५ अन्वयेच्या पत्रामध्ये नंदकिशोर विठठल जाधव यांचे अर्जाच्या अनुषंगाने ते पुढील सहा महिन्या करीता काम करणेस इच्छुक असुन इतर संबधितांचा अर्ज प्राप्त नसलेचे दिसुन येत आहे. व नंदकिशोर विठठल जाधव यांचे काम समाधानकारक असले बाबत सुचित केलेले असुन याबाबत आपलेस्तरावरुन नियमानुसार उचित कार्यवाही करणे बाबत निर्देशित केलेले आहे. तसेच सार्व.बांधकाम विभागाकडील कंत्राटी अभित्यांचे रिक्त जागेवर अभियंत्याची नेमणूक त्वरीत करणे बाबत कार्यवाही व्हावी असे सुचित केलेले आहे.

मा.प्र.शहर अभियंता , बांधकाम विभाग प्रमुख यांचे कडील उपरोक्त संदर्भिय जा.क्र.बांधकाम विभाग ३९१ दिनांक ०१/६/२०१५ अन्वयेच्या पत्रामध्ये परिच्छेद क्र. ३ प्रमाणे सुचित केल्यानुसार करारा नुसार इतर कनिष्ठ अभियंता (सिव्हील) यापदी करारबध्द नियुक्ती बाबत नव्याने वर्तमान पत्रामध्ये जहिरात प्रसिध्दीस देवुन कार्यवाही करावी लागेल.

दि.२/९/२०१४ रोजी मा.स्थायी समिती कार्यालयामध्ये अहमदनगर महानगरपालिकेतील विविध विकास कामा बाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आलेली होती.

सदर बैठकीमध्ये मा.प्र.शहर अभियंता ,बांधकाम विभाग यांनी शहरामधील नगरोत्यान योजने अंतर्गत विविध रस्त्यांच्या कामे चालु असलेल्या कामकाजा बाबत चर्चे दरम्यान बांधकाम विभागामध्ये सद्यस्थितीमध्ये अभियंत्याची पदे अत्यंत कमी प्रमाणात मंजुर असल्याने तांत्रिक अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे तातडीने मानधनावर अभियंत्याची नियुक्ती करणे बाबत सुचित केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेमध्ये सद्यस्थितीमध्ये विविध विभागा अंतर्गत कनिष्ठ अभियंता या पदांची मंजुर , भरलेली , व रिक्त पद संख्या या बाबतचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | पदांचे नांव | मंजुर पद संख्या | भरलेली पद संख्या | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता | १४ | ९ | ५ |
| एकुण | | १४ | ९ | ५ |

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा. शासनाकडे पाठविण्यात आलेला असुन सदर आकृतीबंधास मा.शासनाकडून अद्याप पर्यत मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची - नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही ." असे नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये आस्थापना कायम सुचीवर कनिष्ठ अभियंता (सिव्हील) ही पदे अत्यंत कमी प्रमाणात मंजुर असल्यामुळे बांधकाम विभागा मार्फत विविध योजने अंर्तगत राबविण्यात येत असलेल्या विकास कामामध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होत आहे. त्यामुळे नंदकिशोर विठठल जाधव यांचे अर्जावरील मा.प्र.शहर अभियंता , बांधकाम विभाग प्रमुख यांचे कडील जा.क्र.बांधकाम विभाग ३९१ दिनांक ०१/६/२०१५ अन्वयेचे पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार मा. स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी नंदकिशोर विठठल जाधव यांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारा नुसार रुपये २०,०००/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे कामी निर्णय झाल्यास दरमहा रुपये २०,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च १,२०,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

मा.प्र.शहरअभियंता,बांधकामविभागप्रमुख यांचे कडील जा.क्र.बांधकाम विभाग३९१ ०१/६/२०१५ अन्वयेच्या पत्राच्या अनुषंगाने बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी नंदकिशोर विठठल जाधव यांची त्यांची सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द नियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहामहिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारानुसार२०,०००/-या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्वमंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा निर्णयाकरीता मा.स्थायी समितीकडे पाठविणेबाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्रभारी सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, विषयांकित प्रकरणी मा.मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेणे योग्य, आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, आस्थापना प्रमुख यांनी प्रस्तावित केले प्रमाणे मान्य करणेस हरकत नाही. तथापि आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मा.स्थायी समितीचे पूर्व मंजूरीकरीता प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस हरकत नाही. अ/

यावर मा.उपायुक्त (सा) यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, अ नुसार मान्य.

०००००

फेरसादर,

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी नंदकिशोर विठ्ठल जाधव यांची तांत्रिक खंड देवून अटी शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५३ च्या तरतुदी नुसार सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र. आस्था. ४१ दि.२६/६/२०१५ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.

तथापि सदर बाबत मा.नगरसचिव यांनी त्यांचेकडील जा.क्र. व नगरसचिव विभाग १२५ दिनांक २८/८/२०१५ अन्वये " महानगरपालिका प्रशासनामार्फत दिनांक २६/६/२०१५ रोजी अहमदनगर महानगरपालिकेच्या बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील) या पदी नंदकिशोर विठ्ठल जाधव यांची तांत्रिक खंड देवून अटी शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेसाठी तथा निर्णयासाठी दाखल केला होता. तथापि सदर प्रस्तावास १५ दिवस पेक्षा जास्त कालावधी झालेला आहे आणि याबाबत मा.स्थायी समिती सभेचा निर्णय झाला नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रशासनाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी परत पाठविण्यात येत आहे. असे नमुद करून कळविलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" प्रकरण २ मधील ३ (के) मध्ये जेथे आयुक्तांच्या कोणत्याही प्रस्तावास , या अधिनियमाच्या तरतुदीन्वये घटीत करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या मंजुरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत , समिती, नगरपालिका सचिवांकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर समितीच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, असा कोणत्याही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील- मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो - तसे न केल्यास, अशा प्रस्तावाला समितीने मंजुरी किंवा मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येईल, आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्ताकडून महानगरपालिकेला पाठविण्यात येईल." असे नमुद निर्देशित केलेले आहे.

वरील नगरसचिव विभागाचे दि.२८/८/२०१५ रोजीचे पत्र पाहता व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूची 'ड' प्रकरण २ मधील ३(के) मधील तरतुद पाहता आस्थापना विभागाने दिनांक २६/६/२०१५ रोजी मा.स्थायी समितीकडे सादर केलेल्या प्रस्तावास लगतच्या झालेल्या स्थायी समिती पासून ४५ दिवस झाले किंवा कसे याबाबत बोध होत नसल्यामुळे सदर बाबत नगरसचिव कार्यालयाने कळवुन पुढील कार्यवाही नगरसचिव विभागाने करणे आवश्यक आहे.

तरी त्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूची 'ड' प्रकरण २ चे ३(के) मधील तरतुदीचा विचार करून सदरच्या प्रस्तावावर नगरसचिव विभागामार्फत योग्य तो निर्णय होणे उचित असल्याने सदरचा प्रस्ताव नगरसचिव विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर असे

यावर प्र. सहा. आयुक्त यांचा सहमती दर्शक सही

यावर मा. उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.श्री.कुमार वाकळै :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.श्री.सचिन जाधव :- विषय क्रमांक २१ व २२ पुर्ननियुक्तीचा असल्याने मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- बांधकाम विभागातील अत्यावश्यक सेवेकरीता इंजिनीयची संख्या कमी असल्याने पदास पुर्ननियुक्ती देण्यास व तसेच विषय क्रमांक २२ रक्तपेढी विभागास जनसंपर्क अधिकारी , लॉब टेक्नीशीयान,स्टाफ नर्स या अत्यावश्यक सेवेतील कार्मचा-यांच्या पुर्न नियुक्या असल्याने या विषयास मान्यता देण्यात येत आहे.

मा.श्रीमती मंगला गुंदेचा :- विषय क्रमांक २१ व २२ पुर्ननियुक्तीचा असल्याने मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.कुमार वाकळै :- दोन्ही विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक २१ व २२ ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठरावः-**अहमदनगर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (सिव्हील ) यापदी नंदकिशोर विठ्ठल जाधव यांची तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस पुर्व मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही /-

अनुमोदक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २२ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी,लॅब टेक्निशियन,स्टाफ नर्स यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ : १) रक्तपेढी विभाग जा.क्र.१८ दिनांक ११/५/२०१५ अन्वयेचा प्रस्ताव.

२) रक्तपेढी विभाग जा.क्र. ७७ दिनांक ९/७/२०१५ अन्वयेचा प्रस्ताव

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की , रक्तपेढी विभाग जा.क्र. १८ दिनांक ११/५/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " रक्तपेढी विभागामध्ये खालील तक्त्यामध्ये दर्शविल्या प्रमाणे कर्मचारी तात्पुरत्या स्वरुपात रक्तपेढी विभागामध्ये मानधनावर काम करत असुन त्यांचा कालावधी दि. १३/१/२०१५ ते १२/७/२०१५ अखेर आहे . सदर कर्मचा-यांचे काम समाधानकारक असुन रक्तपेढी विभागासाठी सदर कर्मचा-यांची पुढील सहा महिन्या करीता नेमणूक करण्यात यावी ." असे नमुद करुन सुचीत केलेले आहे.

| अ.क्र. | नांव | पद | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | श्री.संतोष भाऊसाहेब काळे | जनसंपर्क अधिकारी | १३/१/२०१५ ते १२/०७/२०१५ |
| २ | श्री.शेख नईम युसुफ | लॅब टेक्निशियन | १३/१/२०१५ ते १२/०७/२०१५ |
| ३ | सौ.गायकवाड शिल्पा प्रभाकर | परिचारिका | १३/१/२०१५ ते १२/०७/२०१५ |
| ४ | श्रीमती सुलभा प्रकाश पवळ | परिचारीका | १३/१/२०१५ ते १२/०७/२०१५ |
| ५ | श्रीमती अनिता रमेश तोडमल | परिचारिका | १३/१/२०१५ ते १२/०७/२०१५ |

सदर वरील प्रस्तावावर मा.प्र.वैद्यकीय आरोग्यधिकारी , आरोग्य विभाग प्रमुख यांनी " प्रस्तावित 'अ ' प्रमाणे उपरोक्त कर्मचारी यांना नियमानुसार तांत्रिक खंड देवुन पुर्ननियुक्ती देणे बाबत पुढील कार्यवाहीस आस्थापना विभागास आदेशार्थ सादर." असे नमुद केलेले होते.

तद्‌नंतर संदर्भ क्र. २ रक्तपेढी विभाग जा.क्र. ७७ दिनांक ९/७/२०१५ अन्वये पुन्हा प्रस्ताव सादर करुन त्यामध्ये " अहमदनगर महानगरपालिका रक्तपेढी विभागासाठी दोन लॅब टेक्निशियन , तीन परिचारीका , एक जन संपर्क अधिकारी व एक वैद्यकीय अधिकारी यांची मानधनावर नेमणुक सहा महिन्यासाठी आहे. त्यांची मुदत दि. १२/०७/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे.मा.अन्न व औषध प्रशासन कायदा १९४५ यांचे नियमानुसार रक्तपेढी २४ तास चालु ठेवण्यासाठी व रक्तपेढीच्या कामात खंड पडु नये म्हणुन सदरील तांत्रिक कर्मचा-यांची रक्तपेढी साठी आवश्यकता आहे. या सर्व कर्मचा-यांच्या नावाची नोंद मा.अन्न व औषध प्रशासन , महाराष्ट्र राज्य नाशिक विभाग यांचे कार्यालयाकडे झालेली आहे. सदर कर्मचा-यांच्या पुर्ननेमणुकीसाठीचा प्रस्ताव जा.क्र. १८ दिनांक ११/५/२०१५ रोजी सादर केला असुन त्याव्र

आस्थापना विभागा मार्फत सदरचा पुननेमणुकीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवण्यात आल्यामुळे आस्थापना विभागामार्फत या कर्मचा-यांचा नेमणूकीचा आदेश या कार्यालयास मिळालेला नाही त्यामुळे रक्तपेढीच्या कामकाजामध्ये प्रशासकीय व तांत्रिक दृष्ट्या अडथळा निर्माण होत आहे. तरी खालील कर्मचा-यांना नियमानुसार तांत्रिक खंड देऊन पुढील पुर्ननेमणुक पुढील सहा महिन्या करीता करुन कार्योत्तर मंजुरीसाठी मा.स्थायी पुढे प्रस्ताव पाठवणे उचीत वाटते. अन्यथा रक्तपेढी परवाना निलंबित व रद्द होण्याची कारवाई होईल. व रक्तपेढीची सेवा बंद पडेल. तरी सदर खालील कर्मचा-यांना कामावर पुढे या विभागामध्ये कार्यरत ठेवण्यासाठी प्रशासकीय मान्यता देणे कामी प्रस्ताव मंजुरीस्तव व पुर्ननेमणुकीचे आदेश देणे कामी आस्थापना विभागास आदेश होणे बाबत प्रस्ताव सविनय सादर . " असे नमुद करुन सुचीत केलेले आहे.

यापुर्वी रक्तपेढी विभाग जा.क्र. १३८ दिनांक १५ / ११ / २०१४ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार संबधीत यांची तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी , लॅब टेक्निशियन , स्टाफ नर्स या पदी अटी व शर्ती प्रमाणे जा. क्र. आस्था. करारबध्द नेमणूक ७१४८ दिनांक १३/१/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक १३/०१/२०१५ पासुन सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करुन तद्नंतर सदर केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा मा.स्थायी समितीकडे इकडील जा. क्र. आस्था. वर्कशिट ३५३ दिनांक २७ / १ / २०१५ अन्वये पाठविण्यात आलेला होता.

सदर प्रस्तावावर मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३६ दिनांक ३१ / १ / २०१५ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

" अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाच्या अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी , लॅब टेक्निशियन , परिचारीका यापदांवर तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती नुसार जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ७१४८ दिनांक १३ / १ / २०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक १३ / १ / २०१५ पासुन सहा महिन्याकरीता मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजुर ,खर्च मंजुर.

मात्र ऑफिस रिपोर्ट मध्ये जनसंपर्क अधिकारी मानधन कमी दिसते . जनसंपर्क अधिकारी यांचे मानधनामध्ये रुपये ३०००/- ने वाढ करण्यात यावी . दिनांक १ जानेवारी २०१५ पासुन मानधन रुपये १०,०००/- करण्यास ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३६ दिनांक ३१ / १ / २०१५ अन्वयेच्या पारीत ठरावामधील परिच्छेद क्र. २ नुसार रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात लॅब टेक्निशियन यापदी करारा नुसार श्री.संतोष भाऊसाहेब काळे यांची अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती कालावधीतील दरमहा मानधन रु. ७,०००/- वरुन १०,०००/- इतके मानधन जा.क्र.आस्था. १८ दि. ०४ / ०४ / २०१५ अन्वयेच्या कार्यालयीन आदेशान्वये कार्यवाही करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी , लॅब टेक्निशियन , स्टाफ नर्स यापदी करारा नुसार संबधीतांची जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणूक ७१४८ दिनांक १३ / ०१ / २०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक १३/०१/२०१५ पासुन सहा महिन्या करीता दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली आहे.

सदर वरील संबधीतांची तांत्रिक खंड देवुन सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे केलेल्या कालावधीतील मानधनावरील पुर्ननेमणुकीची मुदत ही दिनांक १२/०७/२०१५ रोजी समाप्त होणार आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना कायम सुचीवर सद्यस्थितीमध्ये रक्तपेढी विभागा करीता मंजुर पदे , भरलेली पदे व रिक्त पदे खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं. | पदनाम | मंजुर पद संख्या | भरलेली पद संख्या | रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | मेडीकल ऑफिसर | १ | १ | ------- |
| २ | लॅब टेक्निशियन | ४ | ४ | ------- |
| ३ | जन संपर्क अधिकारी | मंजुर नाही | ------ | ------- |
| ४ | परिचारिका | ४ | ३ | १ |
| | एकुण | ९ | ८ | १ |

अहमदनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेश नियम आकृतीबंधास मंजुरी मिळणे करीता मा. शासनाकडे सदरचा प्रस्ताव पाठविण्यात आलेला असुन अद्यापपर्यत सदर आकृतीबंधास मा. शासना कडून मंजुरी मिळालेली नाही.

सद्यस्थितीमध्ये संदर्भिय प्रस्ताव क्र. १ च्या रक्तपेढी विभागाकडील रक्तपेढी विभाग जा.क्र.१८ दिनांक ११/५/२०१५ अन्वयेचा प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी , लॅब टेक्निशियन , स्टाफ नर्स या पदी दर्शविल्यांची त्यांची अटी व शर्ती नुसार सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता नमुद केलेल्या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणे बाबतच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ अन्वये मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव हा इकडील जा.क्र. आस्था. वर्क. ४४ दिनांक ३० / ६ / २०१५ अन्वये मा.स्थायी समितीकडे यापुर्वीच पाठविण्यात आलेला आहे.

तथापि अद्यापपर्यत मा.स्थायी समितीची बैठक न झाल्याने इकडील जा.क्र. आस्था. वर्क . ४४ दिनांक ३०/६/२०१५ अन्वये पाठविण्यात आलेल्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ अन्वये मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळालेली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

**५३:- नेमणुकीचा अधिकार कोणा मध्ये निहीत असणे.**

(१) महानगरपालिकेच्या जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे - मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत- त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी ज्ञ नेमणुका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहीजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

(२) पोट - कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका मुख लेखापरिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत - यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधीन, यथास्थिति, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल.मात्र , कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणांच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्याव्यतिरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी - मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहीत असेल ;

परंतु , कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजुर केलेल्या, त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधीन असेल :

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्यांहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि लिपिक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदाच्या वेतनाएवढे अथवा त्याहुन अधिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही ." असे नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेकरीता सद्यस्थितीमध्ये जनसंपर्क अधिकारी असे पदनाम आस्थापना कायम सुचीवर मंजुर नाही , तसेच लॅब टेक्निशियन , स्टाफ नर्स ही पदे आस्थापना कायम सुचीवर अत्यंत कमी प्रमाणात मंजुर असल्यामुळे नागरीकांना आपातकालीन परिस्थितीमध्ये वेळेवर तातडीने रक्त पुरवठा देणे मध्ये अनेक अडचणी निर्माण होत आहे. रक्तपेढी विभाग यांचे कडील संदर्भ क्र. २ च्या जा.क्र. रक्तपेढी विभाग ७७ दिनांक ०९/७/२०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी , लॅब टेक्निशियन , परिचारीका या पदी संबधीतांची सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता अटी व शर्ती प्रमाणे करारा नुसार दरमहा मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती करणेस व तद्नंतर सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणे करणे सदरचा हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत निर्णय झाल्यास दरमहा रुपये ४७,०००/- व सहा महिन्याचा एकुण खर्च २,८२,०००/- इतका खर्च अपेक्षित होईल.

रक्तपेढी विभाग यांचे कडील संदर्भिय क्र .२ च्या जा.क्र. रक्तपेढी विभाग ७७ दिनांक ०९ / ०७ / २०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी , लॅब टेक्निशियन , स्टाफ नर्स या पदी खालील तक्त्यात दर्शविल्यांची त्यांची अटी व शर्ती नुसार सदर कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील पुर्ननियुक्तीची मुदत समाप्तीनंतर त्यांना तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्या करीता नमुद केलेल्या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करुन तद्नंतर सदरच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणे करणे सदरचा हा मा.स्थायी समितीकडे पाठविणे बाबत निर्णय झाल्यास उपरोक्त प्रकरणी याबाबत मा.मुख्य लेखाधिकारी व मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा याबाबत अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

| अ. नं. | नांव | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रुजु होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | संतोष भाऊसाहेब काळे | जनसंपर्क अधिकारी | १०,०००/- | रक्तपेढी विभाग |
| २ | श्री.शेख नईम युसुफ | लॅब टेक्निशियन | १३,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ३ | सौ.गायकवाड शिल्पा प्रभाकर | स्टाफ नर्स | ८,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ४ | श्रीमती सुलभा प्रकाश पवळ | स्टाफ नर्स | ८,०००/- | रक्तपेढी विभाग |
| ५ | श्रीमती अनिता रमेश तोडमल | स्टाफ नर्स | ८,०००/- | रक्तपेढी विभाग |

तरी रक्तपेढी विभाग यांचे कडील संदर्भिय क्र .२ च्या जा.क्र. रक्तपेढी विभाग ७७ दिनांक ०९ / ०७ / २०१५ अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त प्रकरणी मा. मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय होवुन सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव आदेशार्थ सविनय सादर.

सोबतः- सदर करारा प्रमाणे अटी व शर्ती नुसार मानधनावर
करारबध्दसाठी नियुक्ती आदेशा बाबतचा प्रारुप

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

यावर प्र. सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, मा.मुलेअ व मा.मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मा.मुख्य लेखा अधिकारी यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केलेप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र मनपा अधिनियम सुधारित २०११ चे कलम ५३(३) नुसार कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मा.स्थायी समितीची कार्योत्तर मान्यता घेणे योग्य राहील तथापी आदेशार्थ.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, उपरोक्त अहवालानुसार मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

००००

फेरसादर,

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, रक्त पेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जनसंपर्क अधिकारी, लॅब टेक्नीशियन , स्टाफ नर्स यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस मा. स्थायी समितीची कार्योत्तर मंजुरी मिळणे करीता सदरचा प्रस्ताव इकडील जा.क्र. आस्था.५४ दि.१५/७/२०१५ अन्वये मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात आलेला होता.

तथापि सदर बाबत मा.नगरसचिव यांनी त्यांचेकडील जा.क्र. व नगरसचिव विभाग १२९ दिनांक २८/८/२०१५ अन्वये " महानगरपालिका प्रशासनामार्फत दिनांक १५/०७/२०१५ रोजी रक्त पेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात जनसंपर्क अधिकारी, लॅब टेक्नीशियन , स्टाफ नर्स यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता दरमहा मानधनावर केलेल्या करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजुरी मिळणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेसाठी तथा निर्णयासाठी दाखल केला होता. तथापि सदर प्रस्तावास १५ दिवस पेक्षा जास्त कालावधी झ ालेला आहे आणि याबाबत मा.स्थायी समिती सभेचा निर्णय झाला नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रशासनाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी परत पाठविण्यात येत आहे. असे नमुद करून कळविलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" प्रकरण २ मधील ३ (के) मध्ये जेथे आयुक्तांच्या कोणत्याही प्रस्तावास , या अधिनियमाच्या तरतुदीन्वये घटीत करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या मंजुरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत , समिती, नगरपालिका सचिवांकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर समितीच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, असा कोणत्याही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील- मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो - तसे न केल्यास, अशा प्रस्तावाला समितीने मंजुरी किंवा मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येईल, आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्ताकडून महानगरपालिकेला पाठविण्यात येईल." असे नमुद निर्देशित केलेले आहे.

वरील नगरसचिव विभागाचे दि.२८/८/२०१५ रोजीचे पत्र पाहता व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूची 'ड' प्रकरण २ मधील ३(के) मधील तरतुद पाहता आस्थापना विभागाने दिनांक २६/६/२०१५ रोजी मा.स्थायी समितीकडे सादर केलेल्या प्रस्तावास लगतच्या झालेल्या स्थायी समिती पासून ४५ दिवस झाले किंवा कसे याबाबत बोध होत नसल्यामुळे सदर बाबत नगरसचिव कार्यालयाने कळवुन पुढील कार्यवाही नगरसचिव विभागाने करणे आवश्यक आहे.

तरी त्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूची 'ड' प्रकरण २ चे ३(के) मधील तरतुदीचा विचार करून सदरच्या प्रस्तावावर नगरसचिव विभागामार्फत योग्य तो निर्णय होणे उचित असल्याने सदरचा प्रस्ताव नगरसचिव विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर असे

यावर प्र. सहा. आयुक्त यांचा सहमती दर्शक सही

यावर मा. उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.श्री.कुमार वाकळै :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.श्री.सचिन जाधव :- विषय क्रमांक २१ व २२ पुर्ननियुक्तीचा असल्याने मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- बांधकाम विभागातील अत्यावश्यक सेवेकरीता इंजिनीयची संख्या कमी असल्याने पदास पुर्ननियुक्ती देण्यास व तसेच विषय क्रमांक २२ रक्तपेढी विभागास जनसंपर्क अधिकारी , लॉब टेक्नीशीयान,स्टाफ नर्स या अत्यावश्यक सेवेतील कार्मचा-यांच्या पुर्न नियुक्या असल्याने या विषयास मान्यता देण्यात येत आहे.

मा.श्रीमती मंगला गुंदेचा :- विषय क्रमांक २१ व २२ पुर्ननियुक्तीचा असल्याने मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.कुमार वाकळै :- दोन्ही विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक २१ व २२ ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी काराराा नुसार तात्पुरत्या स्वरुपात जनसंपर्क अधिकारी,लॅब टेक्निशियन,स्टाफ नर्स यापदी तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्या करीता केलेल्या मानधनावरील करारबध्द पुर्ननियुक्तीस कार्योत्तर मंजूरीस ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्रीमती मंगल गुंदेचा सही /-

अनुमोदक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २३ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार सौ.अनुपमा मोहन गोसावी रा.प्लॉट नं.१४,श्रीराम नगरी,सागर कॉम्पलेक्स पुढे,आगरकर मळा,अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.४ ,वॉर्ड क्रमांक २३, बील क्रमांक ५२९,दोन नळ कनेक्शन ची पाणीपटटी आकरणी झालेली असून प्रत्यक्ष पहाणी केल्या नुसार एक नळ कनेक्शन असल्याने सन २००३-२००४ पासून सन २०१५ अखेर ची पाणीपट्टी ची रक्कम रूपये २१२९२/- निर्लेखित करण्यांस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४

संदर्भ :- सौ. अनुपमा मोहन गोसावी यांचा दि.११/६/२०१५ रोजीचा अर्ज

विनंती अहवाल सादर करण्यात येतो की, सौ. अनुपमा मोहन गोसावी, प्लॉट नं.१४, श्रीरामनगरी, सागर कॉम्पलेक्सच्या पुढे, आगरकर मळा यांनी वॉर्ड क्र.२३ बिल क्र.५२९ येथे एकच नळ कनेक्शन आहे. मात्र आम्हाला दोन नळ कनेक्शनचे बिले येत आहे. त्यामुळे समक्ष खात्री करून एक नळ कनेक्शनचे बिल देण्यात यावे व एक नळ कनेकशनचे बिल रदद करण्यात यावे. असा अर्ज सादर केलेला आहे.

याबाबत वास्तविक परिस्थिती अशी की, वॉर्ड क्र.२३ बिल क्र.५२९ श्रीमती अनुपमा मोहन गोसावी या नावे मिळकत आहे. सदर मिळकतीला घरपट्टी व पाणीट्टीचे वेगवेगळे बिले जात आहे. घरपट्टी बिलामध्ये १/२ " चे पाणीपट्टी आकारली जात आहे. तसेच १/२ " चे स्वतंत्र पाणीपट्टी बिल जात आहे. त्यामुळे या प्रभागाकडील पाणीपुरवठा फिटर यांना तोंडी आदेश देण्यांत आले की, सदर जागेची समक्ष पाहणी करून किती नळ कनेक्शनआहे. याबाबतचा अहवाल त्वरीत इकडेस सादर करावा.

सदर आदेशानुसार पाणी पुरवठा फिटर यांनी दिनांक २४/६/२०१५ रोजी समक्ष पाहणी करून १/२ " चे एक नळ कनेक्शन आढळुन आलेले आहे. असा अहवाल सादर केलेला आहे.

वरील अर्जदार यांचा अर्ज, पा.पु. फिटर यांच्या अहवाल व जा.क्र./ सा.प्र.वि./पी.ए. १९७६ दिनांक ३०/०१/१३ अन्वये प्रदान केलेल्या अधिकार नुसार स्थापन केलेल्या गठीत समितीने सदर ठिकाणी दिनांक रोजी समक्ष पाहणी केली असता १/२ " चे एक नळ कनेक्शन आढळून आलेले आहे. त्यामुळे बिल क्र. WB २१६ चे बिल मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये कायम स्वरूपी रदद करणेस्तव बाबत मा. स्थायी समिती पुढे ठेवणेस आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली मदतनीस यांचा रिपोर्ट असे

यावर मा.प्रभाग अधिकारी यांचा अभिप्राय की, रिव्हीजन विभाग पुढील कार्यवाहीस्तव

यावर कर निरीक्षक यांचा सहमती दर्शक सही

यावर सहाय्यक मूल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, कर निरीक्षक यांचे प्रस्तावानुसार सदर मालमत्तेस म्यु. फिटर यांनी दि.२४/६/२०१५ रोजी पाहणी करून सदर मालमत्तेत एकच नळ कनेक्शन असलेबाबत अहवाल सादर केला असुन घरपटटी व पाणीपट्टीची स्वतंत्र बिले जात असुन घरपट्टी बिलामध्ये पाणी पटटी लागलेली आहे. सन २०१५-१६ अखेर घरपट्टी पाणीपट्टीसह मालमत्ताधारकाने भरणा केलेला असल्याने पाणी पट्टीचे स्वतंत्र बिल महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधि. १९४९ चे कलम १५२ नुसार मा. स्थायी समितीच्या मान्यतेने सन २०१५-१६ अखेर निर्लेखित करणे योग्य आदेशार्थ सादर.

यावर मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावीत केल्याप्रमाणे सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी यांच्या अभिप्रायानुसार कार्यवाही करणेत हरकत नाही. तसेच १ नळजोड नोंद रद्द करणे् उचित राहील.

यावर मा. उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीतनुसार महाराष्ट्र मनपा अधि. कलम १५२ नुसार रक्कम निर्लेखित करणेच्या प्रस्ताव मान्यतेस्तव मे. स्थायी समिती सभेत ठेवणेस हरकत नाही. मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, उपरोक्त सविस्तर अहवालानुसार मा. स्थायी समितीकडे निर्णयाकरिता सादर करणे, उचित होईल.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.श्री.सचिन जाधव :- विषय क्रमांक २३ व २४ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय असल्याने मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय असल्याने मंजूर करण्यात यावे.

मा.श्रीमती मंगला गुंदेचा :- विषय क्रमांक २३ व २४ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय असल्याने मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- या सभेच्या विषयसुची वरील विषय क्र.२३ व २४ हे विषय घरपटटी , पाणीपटटी निर्लेख्ीत करण्याचे आहेत.त्यांची घरपट्टी अथवा पाणिपट्टी जे रिपोर्ट मध्ये नमूद असेल ते निर्लेखीत करण्यात यावे आणि शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

मा.श्री.कुमार वाकळे :- दोन्ही विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सौ सुनिता कांबळे :- विषय मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक २३ व २४ ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावी.

**ठराव :-** अर्जदार सौ.अनुपमा मोहन गोसावी रा.प्लॉट नं.१४,श्रीराम नगरी,सागर कॉम्पलेक्स पुढे,आगरकर मळा,अ.नगर सावेडी प्रभाग समिती क्र.४ ,वॉर्ड क्रमांक २३, बील क्रमांक ५२९,दोन नळ कनेक्शन ची पाणीपटटी आकरणी झालेली असून प्रत्यक्ष पहाणी केल्या नुसार एक नळ कनेक्शन असल्याने सन २००३-२००४ पासून सन २०१५ अखेर ची पाणीपट्टी ची रक्कम रूपये २१२९२/- निर्लेखित करण्यांस ही सभा मान्यता देत आहे. आणि शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.सौ सुनिता कांबळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २४ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार सचिव जयभिम सहकारी भाडेकारी गृहनिर्माण संस्था मर्या. रा. स्टेशन रोड यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२४ बील क्र.३५०, मोकळया प्लॉटची घरपटटी रक्कम निर्लेखित करण्यास मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.४ बुरडगावं रोड

विनंती रिपोर्ट वॉर्ड क्र.२४ चे वसुली लिपिक यांजकडुन देण्यात येतो की, सचिव जयभिम सहकारी भाडेकरी गृहनिर्माण संस्था मर्या. स्टेशन रोड अहमदनगर यांनी दिनांक १५/०६/२०१५ रोजी अर्ज देउन कळविले आहे की, केडगाव सर्व्हे नं.५२७ हा संस्थेच्या मालकीचा असुन मंजुर रेखांकना प्रमाणे एकुण ३१ प्लॉट आहेत. वॉर्ड नं.२४ बिल नं.३५० मोकळी जागा असे बिल येत आहे. सदर मिळकतीचे क्षेत्रफळ ९६ चौ.मीटर चे बिल रद्द करावे अशी मागणी केली आहे.

टाचण रजिष्टरवर वॉर्ड नं.२४ बिल नं.३५० वर सचिव जयभिम सहकारी भाडेकरी गृहनिर्माण संस्था मर्या. स्टेशन रोड, अहमदनगर अशी नोंद आहे. मागील थकबाकी ६१२८+ चालू बाकी ५३३ = ९६६१/- एवढी थकबाकी सन २०१५-२०१६ अखेर आहे.

आज दिनांक ६/८/२०१५ रोजी कर निरीक्षक व वसुली लिपिक शेख हबीब यांचे समवेत समक्ष जागेवर जाउन मंजूर रेखांकनाप्रमाणे सर्व प्लॉटची स्थळ पहाणी केली असता केडगाव सर्व्हे नं.५२७ चे रेखांकना सन १९८८ साली मंजूर झाले असुन एकुण ३१ प्लॉट रेखांकना प्रमाणे जागेवर आढळुन आलेले आहेत. संस्थेने दिलेल्या प्लॉटवर सभासदांनी घरे बांधली असुन सर्व घरांना तत्कालीन नगरपरिषदेने घरपट्टी पाणीपट्टी आकारणी केलेली आहे. प्रत्यक्ष जागेवर एकही भुखंड रिकामा / मोकळा आढळुन येत नाही. मनपाने दिलेले बिल नं.३५० वर प्लॉट नं नमूद केला नसून मोकळी जागा असा उल्लेख आहे व सध्या जागेचे क्षेत्रफळ ९६ चौ.मीटर मोकळी जागा संस्थेमध्ये आढळून येत नाही. केलेली आकारणी चुकीची असल्याचे सकृत दर्शनी निदर्शनास येते.

म्हणून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ नुसार वसुल न होणारी रक्कमा मा.स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणे आवश्यक आहे. वॉर्ड नं.२४ बिल नं.३५० चे मालमत्ता कराचे येणे सन २०१५ ते २०१६ अखेरची (बिल नं.३५० वर असलेली मोकळया जागेची थकबाकी रू.९६६१/- +शास्ती) निर्लेखित करणे कामी सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवण्यास आदेशार्थ सादर.

सोबत- कराधान फॉर्मची झेरॉक्स जोडत आहे.

येणेप्रमाणे वसुल का. , कर निरीक्षक, प्रभाग अधिकारी यांचा रिपोर्ट असे.

यावर रिव्हीजन विभाग यांचा अभिप्राय की, कर निरीक्षक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार व दिनांक ६/८/१५ रोजीचे पाहणीनुसार सदर सर्व्हे नं.५२७ चे रेखांकन १९८८ ला मंजूर होउन त्यामध्ये ३१ प्लॉट टाळण्यात आले. सदर ३१ प्लॉटवर बांधकामानुसार आकारणी झालेली असुन मोकळा भुखंड नसल्याचे प्रस्तावास नमुद केलेले आहे.

महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधि. कलम १५२ नुसार वसुल न होणारी रक्कम मा. स्थायी समितीच्या मान्यतेने निर्लेखित करता येते. त्यानुसार वॉर्ड नं.२४ बिल नं.३५० वरील असलेली रक्कम निर्लेखित करणेकामी मा.स्थायी समितीकडे पाठविणेस आदेशार्थ सादर.

यावर मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, सहाय्यक मूल्य निर्धारक , कर संकलन अधिकारी यांचे अभिप्रायानुसार घरपट्टी निर्लेखित प्रकरणी मा. स्थायी समिती व शास्ती माफी प्रकरणी करून प्राधिकरणाची मंजुरी घेउन कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, यथाप्रस्तावीतनुसार प्रकरणी १५२ नुसार निर्लेखित करण्याची आवश्यक असुन चुकीची आकारणी महाराष्ट्र मनपा अधि. अनूसूची ड नुसार प्रकरण ८ नियम २१ नुसार दुरूस्त करणेस हरकत नाही. मे. आदेशार्थ सादर.

यावर अति. आयुक्त यांचा अभिप्राय की, अ व ब प्रमाणे स्थायी समितीकडे मंजुरी करिता सादर.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

मा.श्री.सचिन जाधव :- विषय क्रमांक २३ व २४ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय असल्याने मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय असल्याने मंजूर करण्यात यावे.

मा.श्रीमती मंगला गुंदेचा :- विषय क्रमांक २३ व २४ घरपट्टी व पाणीपट्टी निर्लेखित करण्याचे विषय असल्याने मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- या सभेच्या विषयसुची वरील विषय क्र.२३ व २ ४हे विषय घरपटटी , पाणीपटटी निर्लेख्ीत करण्याचे आहेत.त्यांची घरपट्टी अथवा पाणिपट्टी जे रिपोर्ट मध्ये नमूद असेल ते निर्लेखीत करण्यात यावे आणि शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

मा.श्री.कुमार वाकळे :- दोन्ही विषय मंजूर करण्यात यावेत.

मा.सौ सुनिता कांबळे :- विषय मंजूर करण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक २३ व २४ ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-** अर्जदार सचिव जयभिम सहकारी भाडेकारी गृहनिर्माण संस्था मर्या. रा. स्टेशन रोड यांना प्रभाग समिती क्र.४ वॉर्ड क्र.२४ बील क्र.३५०, मोकळया प्लॉटची घरपटटी रक्कम निर्लेखित करण्यास ही सभा मान्यता देत आहे. आणि शास्ती निर्लेखीत करण्याचा अधिकार स्थायी समितीला नसल्याने त्याबाबत निर्णय प्रशासकीय पातळीवर घेण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.सौ सुनिता कांबळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २५ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** शिकाउ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाउ उमेदवारांचे विद्यावेतनात झालेल्या वाढीबाबत भारत राजपत्रामध्ये नमुद असल्याने अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेमध्ये प्रशिक्षण घेणा-या शिकाउ उमेदवारांचे सुधारीत विद्यावेतनात सुधारणा करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, शिकाउ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेवर खालीलप्रमाणे जागा स्थित (मंजुर) आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | मुदत | प्रशिक्षण कालावधी | विद्यावेतन |
|---|---|---|---|---|---|
| १ | वायरमन | ३ | १ वर्ष | ३ रे वर्ष | २८०० |
| २ | मेकॅनिकल (मो.व्हे.) | १ | १वर्ष | ३ रे वर्ष | २८०० |
| ३ | पाईप फिटर | २ | २ वर्ष | २ रे वर्ष<br>३ रे वर्ष | २४०० (२ रे वर्ष )<br>२८०० (३ रे वर्ष ) |
| ४ | मेसन | २ | १ वर्ष | २ रे वर्ष | २४०० |
| ५ | इलेक्ट्रीशियन | २ | १ वर्ष | ३ रे वर्ष | २८०० |
| ६ | पंप ऑटरेटर कम मेकॅनिक | ३ | १ वर्ष | २ रे वर्ष | २४०० |
| ७ | कारपेंटर | १ | २ वर्ष | २ रे वर्ष<br>३ रे वर्ष | २४०० (२ रे वर्ष )<br>२८०० (३ रे वर्ष ) |
| ८ | गार्डनर (माळी) | २ | १ वर्ष | १ ले वर्ष | २१०० |
| | एकुण | १६ | | | |

मा. अंशकालीन प्राचार्य , मुलभुत प्रशिक्षण तथा अनुषंगीक सुचना केंद्र द्वारा- औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, अ.नगर यांनी त्यांचेकडील क्र.४५३ दि.३१/१०/२०१४ अन्वये पत्र देउन शिकाउ उमेवारी योजना अधिनियम १९६१ अंतर्गत प्रशिक्षण घेणा-या शिकाउ उमेदवारांचे विद्यावेतनात पत्रासोबत दिलेल्या राजपत्राप्रमाणे वाढ झाल्याचे नमुद करून अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेमध्ये प्रशिक्षण घेणा-या शिकाउ उमेवारांचे विद्यावेतन राजपत्र प्रकाशित झालेल्या दिनांकापासुन सुधारित दराने देणेबाबत कळविले आहे.

संदर्भिय पत्रासोबत दिलेल्या भारत राजपत्र प्रतीचे अवलोकन केले असता शिकाउ उमेदवारी अधिनियम १९६१ अंतर्गत प्रशिक्षणार्थीना दरमहा किमान विद्यावेतन खालीलप्रमाणे राहतील असे नमुद केले आहे.

१] प्रशिक्षण कालावधीच्या १ ल्या वर्षी -- संबंधीत राज्य किंवा संघ राज्य द्वारा अधिसुचित अर्धकुशल कर्मचा-यांच्य किमान वेतनाच्या ७० टक्के

२] प्रशिक्षण कालावधीच्या २-या वर्षी -- संबंधीत राज्य किंवा संघ राज्य द्वारा अधिसुचित अर्धकुशल कर्मचा-यांच्य किमान वेतनाच्या ८० टक्के

३] प्रशिक्षण कालावधीच्या ३ -या व ४ थ्या वर्षी --संबंधीत राज्य किंवा संघ राज्य द्वारा अधिसुचित अर्धकुशल कर्मचा-यांच्य किमान वेतनाच्या ८० टक्के

सदरबाबत आस्था जा.क्र.७३११ दि.१७/०१/२०१५व आस्था. जा.क्र.७३१२दि.१७/०१/२०१५अन्वये अनुक्रमे मा. सहाय्यक कामगार आयुक्त,अ.नगर व मा.अंशकालिन प्राचार्य,अ.नगर यांचेकडेस मार्गदर्शन मागविले असता मा. अंशकालिन प्राचार्य यांनी त्यांचेकडील पत्र दि.४/२/२०१५अन्वये राजपत्रात दर्शविलेली विद्यावेतनाची टक्केवारी ही ज्या त्या सेक्टर मधील / दरावर आधारीत आल्याने वाढीव दराने विद्यावेतन अदा करणेबाबत आपल्या स्तरावर कारवाई करण्यात येवुन, तसे या कार्यालयास अवगत करावे. असे कळविले

आहे. मा. सहाय्यक कामगार आयुक्त, अ.नगर यांचेकडुन मार्गदर्शन प्राप्त झाले नसल्याने त्यांना पुनश्च आस्था. जा.क्र.२७६ दि.१६/४/२०१५ अन्वये मार्गदर्शन मिळणेस विनंती करण्यात आले. तथापी सदरबाबत अद्यापपर्यत त्यांचेकडुन मार्गदर्शन प्राप्त नाही.

शिकाउ उमेदवारी अधिनियम अंतर्गत प्रशिक्षणार्थीना दरमहा किमान विद्यावेतन संबंधीत राज्य अथवा संघ राज्य द्वारा अधिसुचित किमान वेतन दराप्रमाणे देणेबाबत सुचित केले आहे. महाराष्ट्र राज्य किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत अनुसुचित उद्योगाची यादी व परिमंडळ निहाय (परिमंडळ-१, परिमंडळ-२, परिमंडळ-३) दर वेळोवेळी जाहीर करण्यात येते.

परिमंडळ- १:- महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या हद्दीमधील सर्व क्षेत्रांचे मिळुन

परिमंडळ-२ :- महाराष्ट्र राज्यातील "अ" व "ब" वर्ग नगरपरिषदांच्या हद्दीमधील सर्व क्षेत्र/ छावणी क्षेत्र मिळुन

परिमंडळ- ३ :- परिमंडळ १ व २ समोर दर्शविलेले क्षेत्र वगळुन उर्वरित सर्व क्षेत्र

त्यामुळे महाराष्ट्र राज्य किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत अनुसुचित उदयोगाची यादी पाहता सदर यादीमधील "व्हिलेज पंचायत" या उदयोगाचे परिमंडळ-१ चे अर्धकुशल (semiskilled) कर्मचा-याचे दर म्हणजेच २१७०+१४७५= ३६४५ याप्रमाणे लागु करणेस हरकत नाही. त्यानुसार शिकाउ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेवर स्थित पदावरील शिकाउ उमेदवारांना खालीलप्रमाणे सुधारित विद्यावेतन अदा करावे लागेल.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | मुदत | प्रशिक्षण कालावधी | टक्केवारी | सुधारीत विद्यावेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वायरमन | ३ | १ वर्ष | ३ रे वर्ष | ९०% | ३२८१ |
| २ | मेकॅनिकल (मो.व्हे.) | १ | १वर्ष | ३ रे वर्ष | ९०% | ३२८१ |
| ३ | पाईप फिटर | २ | २ वर्ष | २ रे वर्ष<br>३ रे वर्ष | ८०%<br>९०% | २९१६ (२ रे वर्ष )<br>३२८१ (३ रे वर्ष ) |
| ४ | मेसन | २ | १ वर्ष | २ रे वर्ष | ८०% | २९६१ |
| ५ | इलेक्ट्रीशियन | २ | १ वर्ष | ३ रे वर्ष | ९०% | ३२८१ |
| ६ | पंप ऑटरेटर कम मेकॅनिक | ३ | १ वर्ष | २ रे वर्ष | ८०% | २९१६ |
| ७ | कारपेंटर | १ | २ वर्ष | २ रे वर्ष<br>३ रे वर्ष | ८०%<br>९०% | २९१६ (२ रे वर्ष )<br>३२८१ (३ रे वर्ष ) |
| ८ | गार्डनर (माळी) | २ | १ वर्ष | १ ले वर्ष | ७०% | २५५२ |
| | एकुण | १६ | | | | |

तरी मा.स्थायी समितीच्या मंजुरीने राजपत्र प्रकाशित झालेल्या दिनांकापासून उपरोक्त सुधारित दराने विद्यावेतन अदा करणेस व देय फरक अदा करणेस तसेच महाराष्ट्र राज्य किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत अनुसुचित उदयोगाची यादी व परिमंडळ निहाय दर वेळोवेळी जाहीर करण्यात येते त्याप्रमाणे सुधारित दराने विद्यावेतन अदा करणेस मंजुरी मिळावी ही विनंती. तथापी आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर प्र. सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार सदर बाब धोरणात्मक स्वरूपाची असल्याने निर्णयाकरिता मा. स्थायी समिती समोर ठेवणेस हरकत नाही.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, मुलेप यांचे अभिप्रायानुसार मा.स्थायी समितीसमोर प्रस्तावीत करणे योग्य

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मान्य

०००

फेरसादर,

शिकाउत्र उमेदवार अधिनियम १९६१अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेवर स्थित पदावरील शिकाउत्र उमेदवारांना सुधारित विद्यावेतन व फरक अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव ठेवणेकामी आस्था. वर्क जा.क्र.७५ दि.२४/७/२०१५ अन्वये नगरसचिव विभागाकडे पाठविण्यांत आला. तथापी सदर बाबत नगरसचिव कार्यालयाने दि.२८/८/२०१५ रोजी "महानगरपालिका प्रशासनामार्फत दि.२४/७/२०१५ रोजी अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेमध्ये प्रशिक्षण घेणा-या शिकाउत्र उमेदवारांचे सुधारित विद्यावेतनात सुधारणा करणेबाबत ऑफिस रिपोर्ट बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या मान्यतेसाठी तथा निर्णयासाठी दाखल केला होता. तथापी सदर प्रस्तावास १५ दिवस पेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. आणि याबाबत मा.स्थायी समिती सभेचा निर्णय झाला नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रशासनाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी परत पाठविण्यात येत आहे. " असे कळविले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अनुसूची ड प्रकरण २ मधील ३(के) मध्ये जे आयुक्तांच्या कोणत्याही प्रस्तावास या अधिनियमाच्या तरतुदीचे घटीत करण्यात आलेल्या कोणत्याही समितीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत , समिती , नगरपालिका सचिवांकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर समितीच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासुन पंचेचाळीस दिवसांच्या आत असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील- मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसुचीवर घेतलेली असो किंवा नसो- तसे न केल्यास अशा प्रस्तावाला समितीने मंजूरी किंवा मान्यता दिलेली असल्याचे मान्यता येईल.आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्ताहून महानगरपालिकेला पाठविण्यांत येईल.' अशी तरतुद आहे.

वरील नगरसचिव विभागाचे दिनांक २८/८/२०१५रोजीचे पत्र पाहता व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे अनुसूची 'ड' प्रकरण-२ मधील ३ (के)मधील तरतूद पाहता आस्थापना विभागाने दि.२४/७/२०१५ रोजी मा. स्थायी समितीकडे सादर केलेल्या प्रस्तावास लगतच्या झालेल्या स्थायी समिती पासून ४५ दिवस झाले किंवा कसे याबाबत बोध होत नसल्यामुळे सदर बाबत नगरसचिव कार्यालयाने कळविणे आवश्यक आहे.

तरी त्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची 'ड' प्रकरण -२ चे ३ (के) मधील तरतुदीचा विचार करून सदरच्या प्रस्तावावर नगरसचिव विभागामार्फत योग्य तो निर्णय होणे उचित वाटते. तथापी आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर असे.

यावर प्र. सहा. आयुक्त यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- शिकाउ‌ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाउ उमेदवारांचे विद्यावेतनात झालेल्या वाढीबाबत भारत राजपत्रामध्ये नमुद असल्याने अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेमध्ये प्रशिक्षण घेणा-या शिकाउ उमेदवारांचे सुधारीत विद्यावेतनात सुधारणा करणे हा विषय आहे.

मा.श्री.कुमार वाकळै :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखववावा.

त्या प्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.संपत बारस्कर :- उपायुक्त साहेब माहीती सांगा.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- मा. शासनाने केलेल्या सुधारणा नुसार प्रस्तावीत केले आहे.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्रीमती मंगला गुंदेचा :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टानुसार शिकाउ‌ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत शिकाउ उमेदवारांचे विद्यावेतनात झालेल्या वाढीबाबत भारत राजपत्रामध्ये नमुद असल्याने अहमदनगर महानगरपालिका आस्थापनेमध्ये प्रशिक्षण घेणा-या शिकाउ उमेदवारांचे सुधारीत विद्यावेतनात सुधारणा करणेस ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.सौ सुनिता कांबळे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २६ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** श्री.वसंत कान्होजी मेघडंबर,पा.पु.बिगारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत ) २०१२ चे कलम ५६ (१) (ड) प्रमाणे म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करणे बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ :- १. आस्थापना जा.क्र. ४७५२ दि.२६/९/२०१४

२. मा.मनपा विधिसल्लागार यांचे कडील पत्र

३. मा. औद्योगिक न्यायालय येथे श्री. मेघडंबर यांनी दाखल केलेली तक्रार (युएलपी) २००/२०१३

४. मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठातील याचिका क्र.१४५१/२००९ मधील दि.२६/११/२०१२ रोजीचे मा.उच्च न्यायालयाचे आदेश

५.शासन निर्णय क्र. अमपा १२०७ /५५६/प्र.क्र.२६६ /०७/नवि-२४ दि.२९/०१/२००९

६.मा.स्थायी समिती ठराव क्र.२ दिनांक २०/१२/२००६

७. जा.क्र.कामगार विभाग ७७८ दि.२२/६/२००६ ची कारणे दाखवा नोटीस

सादर,

वरील विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, श्री. मेघडंबर वसंत कान्होजी यांना संदर्भ क्र.७ येथील नोटीसीमध्ये सुचिवलेली शिक्षा संदर्भ क्र. १ येथील आदेशान्वये कायम करण्यात आलेली आहे. श्री. मेघडंबर यांना कारणे दाखवा नोटीसी मध्ये खालील प्रमाणे शिक्षा सुचवलेली होती.

१. तुम्ही प्रत्यक्ष काम न करता वेतन व भत्ते म्हणून घेतलेली रक्कम रू.२९८३३५/-(रूपये दोन लाख अठठयाणव हजार दोनशे पस्तीस फक्त) वसुल करण्यात येत आहे.
२. तुम्हास महानगरपालिका सेवेतुन बडतर्फ करण्यात येत आहे.

संदर्भ क्र.-१ आदेशानुसार श्री. मेघडंबर यांचेवर सुचवलेल्या कारणे दाखवा नोटीसीतील शिक्षेची अंमलबजावणी बाबत संभ्रम निर्माण होत असुन खालील कायदेशीर बाबी उपस्थित होत आहे.

श्री. मेघडंबर यांचे बडतर्फ आदेशातील शिक्षेबाबत परिच्छेद १ नुसार तुम्ही प्रत्यक्ष काम न करता वेतन व भत्ते म्हणून घेतलेली रक्कम रू.२९८३३५/- /-(रूपये दोन लाख अठठयाणव हजार दोनशे पस्तीस फक्त) वसुल करण्यात येत आहे. असे नमुद आहे. व त्यानुसार त्यांचे कडून येणे असलेली सदर रक्कम कशा प्रकारे वसुल करता येईल याबाबत मुद्दा उपस्थित झालेला आहे. श्री. मेघडंबर हे दि.२५/१२/१९९७ ते ३१/८/२००४ अखेर त्यांनी काम केल्याचे सिध्द करू शकलेले नाहीत. चौकशीअंती त्यांचेवरील आरोप साबित झाल्याने त्यांना दोषी धरण्यात आले व त्यांना कलम ५६ नुसार सेवेतुन बडतर्फ करणे व त्याच्या कडुन त्यांना वेतन भत्ते म्हणून अदा केलेली रक्कम रू.२,९८,३३५/- वसुल करणे बाबत शिक्षा प्रस्तावित करणेत आली होती. त्यानुसार त्यांना संदर्भ क्र.७ नुसार कारणे दाखवा नोटीस देण्यांत आलेली होती.

महानगरपालिका अधिनियम १९४९च्या कलम५६(१)च्या परंतु अन्वये सदरची शिक्षा अंतिम होणे कामी स्थायी समितीची पुर्वमंजुरी आवश्यक असलेने अहवाल मंजुरीस्तव स्थायी समिती पुढे ठेवण्यात आला असता तदनंतर मा.स्थायी समितीने ठराव नं.२ दि.२०/१२/२००६ अन्वये पुढील प्रमाणे ठराव पारित केलेला होता.

श्री. वसंत कान्हुजी मेघडंबर बिगारी यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशीमध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५६नुसार मनपा सेवेतुन बडतर्फ करणेस त्यांना वेतन भत्ते म्हणून अदा केलेली रक्कम रूपये २९८३३५/- (रूपये दोन लाख अठठयाणव हजार दोनशे

पस्तीस फक्त)वसुल करणेस तसेच नियंत्रण अधिकारी म्हणून कर्तव्यात कसुर करणे या सदर खाली उदयान विभाग प्रमुख यांचेवरही कारवाई करणे प्रकरणी सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

श्री. मेघडंबर व का. यांना त्यांचा पगार देण्याचे बंद केल्याचे तारखेपासून कामावर हजर होईपर्यंतचा कालावधी असाधारण रजा धरणेत यावी.व त्यांना दिलेले मागील वेतन भत्ते त्यांचेकडून वसुल करणेत येवु नयेत.त्यांच्या तीन वेतन वाढी तीन वर्षासाठी रोखुन त्यांना त्वरीत कामावर हजर करून घेण्यात यावे. नियंत्रण अधिकारी म्हणून कर्तव्यात कसुर करणे या सदराखाली उदयान विभाग प्रमुख यांचा खाते निहाय चौकशी अहवाल त्वरीत सादर करण्यात यावा.

सदरचा ठराव हा महापालिकेच्या हिताचे विरूध्द असलेने स्थायी समितीने केलेल्या ठरावाच्याबाबत मा. शासनाकडे मार्गदर्शन मागविले असता मा. शासनाने त्यांचे कडील शासन निर्णय क्र. १२०७/५५६/प्र.क्र.२६६/०७/नवि-२४ दि.२९/१/२००९ नुसार मा.स्थायी समितीने केलेल्या ठराव महानगरपालिकेच्या हिताचा नसल्याने ठराव महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१ नुसार विखंडीत केलेला आहे.

श्री. मेघडंबर यांनी याबाबत कार्यवाही करू नये म्हणून मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याचिका क्र.१४५१/२००९ दाखल केलेली होती. सदर याचिका न्यायप्रविष्ठ असल्याने विभागीय चौकशीच्या निकालानुसारचा बडतर्फीचा आदेश निर्गमित करणेत आलेला नव्हता.

तथापी मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात याचिका क्र.१४५१/२००९ वर २६/११/२०१२ रोजी झालेल्या सुनावणी मध्ये उच्च न्यायालयाने " Learned counsel for petitioner, on instruction,seeks leave to withdraw the petition with liberty to approach labour court or industrial tribunal. leave granted with liberty as prayed for while considering the aspect of delay in filing application, the concerned tribunal may consider the period spent for prosecuting the remedy of writ petition before this court and pass suitable order in accordance with provision of law petiton stands rejected as withdrawn असे आदेश दिलेले आहेत.

त्यानुसार श्री. मेघडंबर यांनी त्यांना कामावर हजर करून घेणेबाबत संदर्भ क्र.३ नुसार तक्रार (युएलपी) २००/२०१३ मा. औद्योगिक न्यायालयात दाखल केलेली आहे. सदरची तक्रार मा. औघोगिक न्यायालयात न्यायप्रविष्ठ असुन तिचा निकाल अद्याप झालेला नाही.

संदर्भ क्र.३ येथील मनपा विधी सल्लागार यांचेकडे श्री. वसंत कान्होजी मेघडंबर यांचे बडतर्फीबाबत अभिप्राय मागितला असता त्यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

प्राप्त कागदपत्र पाहता असे दिसुन येते की, महानगरपालिका यांनी अद्यापपावेतो संबंधित कामगाराच्या सेवेबाबत कोणताही अंतिम निर्णय घेतलेला दिसुन येत नाही. त्यांच्या सेवेबद्दल अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार महानगरपालिकेला आहे. दरम्यानचे काळात तक्रारदार यांनी मा. औद्योगिक न्यायालयात तक्रार युएलपी २००/२०१३ दाखल केलेली आहे. परंतु त्यासंबंधीत अद्यापपावेतो कोणताही निर्णय झालेला नाही. त्यामुळे सदर प्रकरणी आपल्या पातळीवर योग्य तो अंतिम निर्णय घेणे उचित होईल.

आस्थापना विभागामार्फत दि.३/७/२०१४ रोजी बडतर्फीबाबतचा प्रस्ताव सादर करणेत येवून सदर प्रस्तावामध्ये श्री. मेघडंबर यांनी मा. औद्योगिक न्यायालयात न्यायप्रविष्ट असलेली तक्रार युएलपी २००/२०१३ बाबत तसेच शिक्षेची अंमलबजावणी कशी करता येईल याबाबत नमुद करणेत आलेले नाही. सदर प्रस्तावास

मा.आयुक्त यांनी दिनांक ३/९/२०१४ रोजी मान्यता दिलेली असल्याने संदर्भ क्र.१ च्या आदेशानुसार श्री. मेघडंबर यांना बडतर्फीचा आदेश देण्यात आलेला आहे. त्यातील शिक्षेबाबत परिच्छेद-१ नुसार तुम्ही प्रत्यक्ष काम न करता वेतन व भत्ते म्हणून घेतलेली रक्कम रूपये २९८३३५/- (रूपये दोन लाख अठठ्याणव हजार दोनशे पस्तीस फक्त) वसुल करण्यात येत आहे. असे नमुद आहे. परंतु सदरची रक्कम वसुल करणेकरिता श्री. मेघडंबर यांना महापालिकेकडून कुठलीही रक्कम देय नसल्याचे दिसुन येत आहे. तसेच त्यांचा दि.२५/१२/९७ पासूनचा सेवा कालावधी हा विवादित असलेने व सद्यस्थितीत सदर बाबत मा. औद्योगिक न्यायालयात तक्रार युएलपी २००/२०१३ न्यायप्रवीष्ट असल्याने व तसेच त्यांचा बडतर्फी आदेश २६/९/२०१४ रोजी काढणेत आलेला असल्याने व त्यांचे सेवा कालावधीबाबत अद्याप अंतिम न्यायालयीन निर्णय झालेला नसल्याने त्यांचे कडून येणे असलेली रक्कम कशी वसुल करावी याबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे.

तसेच आदेशातील शिक्षेबाबतचा परिच्छेद २ नुसार तुम्हास महानगरपालिका सेवेतून बडतर्फी करण्यात येत आहे. असे नमुद आहे. तथापी श्री. मेघडंबर यांचा महापालिकेतील बडतर्फीचा दिनांक हा आदेशाचा दिनांक धरावयाचा किंवा कारणे दाखवा नोटीसीचा दिनांक ग्राहय धरून कार्यवाही करावी किंवा मा.शासनाच्या दिनांक २९/१/२००९ च्या आदेशाच्या दिनांकान्वये त्यांचा बडतर्फी दिनांक समजावा किंवा मा. औद्योगिक न्यायालयात न्यायप्रविष्ठ तक्रार युएलपी २००/२०१३ च्या निर्णयाच्या अधिन राहुन बडतर्फी दिनांक ठरविणे बाबत कार्यवाही करावी याबाबत स्पष्टता नसल्याने आदेशाची अंमलबजावणी करणेबाबत संभ्रम निर्माण होत आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी श्री. मेघडंबर यांचे आदेशातील शिक्षेच्या अंमलबजावणीच्या संदर्भात संभ्रम निर्माण होत असलेने भविष्यात कायदेशीर मुद्दे उपस्थित होवुन न्यायालीन विवाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव प्रस्तुत प्रकरणी भविष्यात कायदेशीर मुद्दे उपस्थित न होता आदेशातील शिक्षेची अंमलबजावणी कशा प्रकारे करता येईल याबाबत मनपा विधिज्ञ यांचा स्पष्ट कायदेशीर अहवाल मागवून अहवालात प्राप्त होणा-या अभिप्रायानुसार श्री. मेघडंबर यांचे बडतर्फी आदेशात नमुद शिक्षेबाबत अंमलबजावणी करणेबाबत निर्णय घेणे उचित होईल तथापी मंजुरीस्तव सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे

यावर प्र. सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मनपा विधिज्ञ यांचा अभिप्राय घेणे उचित होईल आदेशार्थ सादर.

यावर मा. उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, तात्काळ अभिप्राय मागवा (मुदत दोन दिवस)

०००० 

फेरसादर,

प्रस्तुत प्रकरणी फेरसादर करणेत येते की, श्री. वसंत कान्होजी मेघडंबर पा.पु.बिगारी यांना आस्थापना आदेश क्र.४७५२ दि.२६/९/२०१४ अन्वये खालीलप्रमाणे शिक्षा देणेत आलेली आहे.

१. तुम्ही प्रत्यक्ष काम न करता वेतन व भत्ते म्हणून घेतलेली रक्कम रू.२९८३३५/- वसुल करण्यात येत आहे.
२. तुम्हास महानगरपालिका सेवेतून बडतर्फ करण्यात येत आहे.

श्री. मेघडंबर यांच्या आदेशात नमुद असलेनुसार सदरचा आदेश उदयान विभागाकडे बजावणीकरीता पाठविण्यात आलेला होता. त्यानुसार उदयान विभाग प्रमुख यांनी सार्व. उदयान विभाग जा.नं.३९५ दिनांक १/११/२०१४ नुसार सादर करून कळविले आहे की, आस्थापना विभागाकडून वसंत कान्होजी मेघडंबर यांचे

शिक्षा झालेले व बडतर्फे केलेले टपाल घेवून ऑफिस शिपाई श्री. जललालुदीन शेख हे गेले असता त्यांचे जुने घर नालेगांव गाडगाळी पटांगण येथे ते आढळुन आले नाहीत तसेच त्यांनी ते विकले आहे त्यामुळे त्यंचा पत्ता उदयान विभागाकडे नाही त्यामुळे त्यांना टपाल बजावता आलेले नाही त्यामुळे त्यांचे टपाल आस्थापना विभागाकडे पुढील कार्यवाहीस्तव सादर करून सोबत श्री. जलाललुदीन शेख शिपाई यांचा दिनांक १६/१०/२०१४ रोजीच्या अहवाल सोबत जोडलेला आहे. श्री. मेघडंबर यांचा बतडर्फीचा आदेश त्यांच्या वास्तव्याचा ठिकाण बदलले असलेने व त्यांचे सध्याचे वास्तव्याचे ठिकाणाबाबत माहिती उपलब्ध झालेले नसलेने त्यांना अद्याप बजावणे शक्य झालेले नाही.

दरम्यानचे काळात श्री. मेघडंबर यांचे बडतर्फी आदेशातील शिक्षेच्या अंमलबजावणीच्या संदर्भात

१. मा. औद्योगिक न्यायालयात तक्रार युएलपी २००/२०१३ न्यायप्रविष्ठ असलेने त्यांचेकडून येणे रक्कम कशाप्रकारे वसुल करता येईल. ?
२. श्री. मेघडंबर यांचे सेवा कालावधीबाबत अद्याप अंतिम न्यायालयीन निर्णय झालेला नसल्याने त्यांच्या विवादीत सेवा कालावधीबाबत मनपा स्तरावरून काय कार्यवाही करता येईल.?
३. प्रकरण न्यायप्रविष्ठ असलेने श्री. मेघडंबर यांचा बडतर्फीचा कुठला दिनांक ग्राहय धरणेत यावा.?

याबाबत संभ्रम निर्माण होत असलेने भविष्यात कायदेशीर मुददे उपस्थित होवुन न्यायालयीन विवाद निर्माण होवु नये यास्तव भविष्यात न्यायालयीन विवाद उपस्थित न होता आदेशातील शिक्षेची अंमलबजावणी कशा प्रकारे करता येईल याबाबत मा. विधी सल्लागार यांचेकडे आस्थापना जा.क्र.५४७५ दिनांक ५/११/२०१४ नुसार न्यायालयीन कायदेशीर बाबी तपासून स्पष्ट अभिप्राय मागविण्यात आले होते. त्यांनी दिनांक २६/५/२०१५ रोजी पत्र देवुन खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहे.

"सदर प्रकरणी प्राप्त कागदपत्र पाहता असे दिसुन येते की, श्री. वसंत कान्हुजी मेघडंबर यांनी आपल्याकडील पत्र जा.क्र. आस्था.४७१२ दिनांक २६/९/२०१४ रोजीचे आदेशान्वये बडतर्फे केल्याचे दिसुन येत आहे. श्री. मेघडंबर यांचेकडून रक्कम वसुली बाबत कारवाई महानगरपालिकेकडे आस्तित्वात असलेल्या तरतुदी प्रमाणे रक्कमेची वसुली करणे उचित होईल अथवा योग्य त्या न्यायालयात वसुली साठी दावा दाखल करणे योग्य होईल तथापी योग्य तो निर्णय आपल्या स्तरावर घेणेत यावा."

प्रसतु प्रकरणी , श्री. मेघडंबर यांचे वास्तव्याचे ठिकाण अद्याप उपलब्ध होत नसलेने त्यांचा बडतर्फीचा आदेश व तसेच श्री. मेघडंबर यांना सदरचा आदेश आस्थापना विभागातून प्राप्त करणेस पंधरा (१५) दिवसाची मुदत देवुन व सदर मुदतीत त्यांनी बडतर्फी आदेश प्राप्त करून न घेतल्यास त्यांना बडतर्फ समजणेत येवुन पुढील कार्यवाही करणेत येईल असे नमुद करून प्रसिध्दी विभागामार्फत राज्यस्तरीय व स्थानिक वर्तमान पत्रात जाहीर नोटीस प्रसिध्दीस देणेस व त्यानुसार आदेशातील शिक्षेच्या अंमलबजावणीबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे अभिप्राय घेवुन पुढील कार्यवाही करणे उचित होईल असे वाटते.

तरी श्री. मेघडंबर यांचे प्रस्तुत प्रकरणी मा. मुख्य लेखा परिक्षक अहमदनगर महानगरपालिका यांचे अभिप्राय घेवुन वर नमुद केलेनुसार बडतर्फी आदेश प्रसिध्दी विभागामार्फत राज्यस्तरीय व स्थानिक वर्तमान नोटीस प्रसिध्दीस देणेबाबत प्रसिध्दी विभागास आदेश होणेस व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरीस्तव सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

यावर प्र.सहा. आयुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार मा. मुलेप यांचा अभिप्राय घेणे योग्य आदेशार्थ सादर. /अ

यावर उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा. आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" नुसार सादर करावे.

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे श्री. मेघडंबर यांना सेवेतून बडतर्फे करणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारित) २०१२ चे कलम ५६(१) (ड) प्रमाणे मा. स्थायी समितीची पुर्व मान्यता घेउन नमुद केलेप्रमाणे मा. विधी सल्लागार यांचे अभिप्रायाप्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही./ब

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा. आयुक्त साहेब यांचा "ब" नुसार मान्य

००००

फेरसादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" प्रकरण २ चे ३ (के) नुसार जेथे आयुक्तांच्या कोणत्याही प्रस्तावास या अधिनियमाच्या तरतुदीन्वये घटी करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या मंजुरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्या बाबतीत, समिती, नगरपालिका सचिवाकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर समिती लगतच्या घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, असा कोणत्याही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसुचीवर घेतलेली असो वा नसो तसे न केल्यास अशा प्रस्तावाला समितीने मंजुरी किंवा मान्यता दिलेली असल्याने मानण्यात येईल. आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्तांकडून महानगरपालिकेला पाठविण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणी नगरसचिव यांनी जा.क्र.१४० दिनांक २८/८/२०१५ नुसार श्री. वसंत कान्होजी मेघडंबर , पा.पु. बिगारी यांना बडतर्फे करणेबाबत प्रस्ताव मा. स्थायी समिती निर्णयास्तव दाखल होउन १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधी झालेला असुन स्थायी समिती सभेचा निर्णय झाला नसल्यामुळे सदरचा प्रस्ताव प्रशासनाकडे पुढील कार्यवाहीस्तव परत पाठविलेला आहे.

तथापी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" प्रकरण २ चे ३ (के) पाहता स्थायी समितीच्या लगतच्या घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून ४५ दिवसाचा विचारधीनतेचा कालावधी विहीत झालेला असल्याने प्र.नगरसचिव यांनी पत्रात नमुद केलेला १५ दिवसाचा स्थायी समितीचा विचारधीनता कालावधी विचारात घेणे उचित वाटत नाही.

तरी प्र.नगरसचिव यांना उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार प्रस्तु प्रकरणाबाबत कार्यवाही करणेकामी प्रस्तुत प्रकरण पुनश्चः त्यांचेकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर असे

यावर प्र. सहाय. आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- श्री.वसंत कान्होजी मेघडंबर,पा.पु.बिगारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (सुधारीत ) २०१२ चे कलम ५६ (१) (ड) प्रमाणे म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करणे बाबतचा आहे.

मा.श्री. संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- बडतर्फे केलेले आहे. ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविला.

मा.सभापती साहेब :- कशासाठी बडतर्फे करायचे

मा.श्री. श्रीपाद छिंदम :- रूपये १९८०००/- पगार कोणी केला.

मा.सौ. छाया तिवारी :- २००९ मध्येच हा विषय झालेला होता.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- दिनांक २५/१२/१९९७ ते ३१/८/२००४ अखेर काम न केल्यामुळे कारणे दाखवा नोटीस देवून विभागीय चौकशी होवून, चौकशी मध्ये आरोप सिध्द झाल्याने मनपा सेवेतून बडतर्फ करणेस व त्यांना वेतन व भत्ते म्हणून अदा कलेली रक्कम रूपये २,९८,३३५/- वसूल करणे बाबत शिक्षा अंतिम होणे कामी स्थायी समितीची पूर्व मंजूरी आवश्यक असल्याने अहवाल मंजूरीस्तव ठेवण्यात आला असता.मा.स्थायी समितीने ठराव क्र. २ दिनांक २०/१२/२००६ अन्वये श्री.मेघडंबर यांना त्वरीत कामावर हजर करून घेण्यात यावेत.व त्यांना दीलेले मागील वेतन व भत्ते वसूल करण्यात येवू नये. असा ठराव पारित करण्यात आला.सदर चा ठराव महानगरपालिकेच्या हिताच्या विरूध्द असल्याने ठरावा बाबत मा.शासनाकडे मार्गदर्शन मागविले असता मा.शासनाने शासन निर्णय दि. २९/१/२००९ नुसार महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१ नुसार मा.स्थयी समितीने केलेला ठराव विखंडीत केलेला आहे.श्री. मेघडंबर यांनी या बाबत कार्यवाही करून नये म्हणून मा.औरंगाबाद खंडपिठात १४५१/२००९ याचिका दाखल केली होती. सदर याचिकेत २६/११/२०१२ रोजी मे.कोर्टाने लेबर कोर्ट किंवा इंडस्ट्रीयल कोर्ट येथे दाखल होण्या बाबत.उशिर माफीचा कालावधी मंजूर करून याचिका परत मागे पाठविली आहे.दरम्यानच्या काळात मा.औदयोगीक न्यायालयात तक्रार यू.एल.पी.२००/२०१३ दाखल केलेली आहे.परंतू त्या संबंधी अदयापपावेतो कोणताही निर्णय झालेला नाही.

मा.श्री. सचिन जाधव :- १९९७ ते २००४ पर्यतचे पेमेंट कधीपर्यत करेल

मा.सभापती साहेब :-काम करत नव्हते तर पेमेंट कसे काढले.

मा.श्री. सचिन जाधव :- त्यांच्याकडून आपल्याला पैसे भरून घ्यायचे. कामावर नसताना पेमेंट केले ते कसे काढले मनपा झोपली होती का ? ७ वर्ष कंटीन्यू पेमेंट काढतो.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- दोषारोप सिध्द झालेल्यानुसार कार्यवाही केली.

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- विभागीय चौकशीत आरोप निषन्न झाले निर्वाह त्याची रक्कम रूपये २९८०००/- वसुल करावी असा चौकशीत निर्णय झाला निर्वाह भत्ता रक्कम आधी ५०% व नंतरची ७५% रक्कम आहे अशी माझी माहिती आहे.

मा.सभापती साहेब :- ७ वर्षे कामावर येत नाही. व पगार घेतो. असे होत नाही.याला जबाबदार कोण आहे तो जबाबदार आहे का, जो डयुटी लावतो तो आहे, यात कोणीतरी जबाबदार असेल ना

मा.श्री. सचिन जाधव :- चौकशी केव्हा झाली.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- आदेश २६/९/२०१४ ला बडतर्फी आदेश काढला.

मा.सभापती साहेब :- काम करत नाही असे केव्हा कळाले.यानंतर आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे गार्डन विभागाच्या प्रस्तावावर कारवाई केली. गोयल त्याची बदली पाणीपुरवठयात झाली.२०/१२/२००६ मा.स्थायी सामितीचा ठराव झाला त्यामध्ये श्री.मेघडंबर यांना त्यांचा पगार बंद केल्याचे तारखेपासून कामावर हजर होई पर्यत चा कालावधी असाधारण रजा धरण्यात यावी व त्यांना दिलेले मागील वेतन भत्ते त्यांचे कडून वसूल करण्यात येवू नये, त्यांच्या तिन वेतन वाढी तीन वर्षासाठी रोखून त्यांना त्वरीत कामावर हजर करून घेण्यात यावे नियंत्रण अधिकारी म्हणून कर्तव्यात कसर करणे या सदरा खाली

उदयान विभाग प्रमुख यांचा खातेनिहाय चौकशी अहवाल त्वरीत सादर करण्यात यावा असा ठरावात उल्लेख आहे.

उदयान प्रमुख श्री.गोयल :- बँकेमध्ये पगार जायचे पाणीपुरवठा बदली झाली होतो. पाणी पुरवठा विभागाकडे तो हजर झाला नव्हता व परस्पर बँकेतून पगार काढून घ्यायला मस्टर नव्हते तालीम मास्टर म्हणून काम करायचा

मा.श्री. सचिन जाधव :- लेबर कोर्टात तक्रार वगैरे दाखल आहे का सोनवणे २००९ ला बडतर्फे केलेल्या निर्णया विरूध्द इंडस्ट्रीकल कोर्टात कसे दाखल केले. १४५१/२००९ औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केले दि.२६/११/२०१२ ला हायकोर्टाने निर्णय दिला २००/२०१३ला औद्योगिक न्यायालयात याचिका दाखल आहे.

मा.श्री. सचिन जाधव :- न्यायालयात प्रक्रिया चालू आहे मग आम्ही आज यावर निर्णय घेवू शकतो का

मा.श्री. सचिन जाधव :- रक्कम वसुल करणे संदर्भात व पत्ता सापडत नाही म्हणून एक्स पार्टी ऑर्डर साठी हा प्रस्ताव ठेवला आहे केंद्र शासनाकडे न्यायप्रविष्ट आहे निर्णयच झाला नाही तर रक्कम आम्ही कशी निश्चित करायची

मा.सभापती साहेब :- ज्यांनी पगार काढला त्यांच्यावर कारवाई करा

मा.श्री. सचिन जाधव :- ज्यांनी पगार काढला यांचेकडून व्याजासह वसुल करावे.व निर्णय झाल्यानंतर रक्कम परत करा. तो अनूसुचित जातीचा कर्मचारी आहे त्याबाबतीत जर वेगळा निर्णय झाला तर त्याची जबाबदारी कोण घेणार

मा.श्री. दिप चव्हाण :- आजचा विषय काय आहे.

मा.उपायुक्त(सा.) श्री. चारठाणकर :- यापूर्वीच बडतर्फे करण्यात आले आहे रक्कम वसुल करण्यासाठी हा विषय घेण्यात आला आहे.

मा.श्री. दिप चव्हाण : ४५१ खाली ठराव शासनाकडे पाठविला तो कुणाचा होता

मा.उपायुक्त (सा.) श्री. चारठाणकर :- स्थायी समितीचा ठराव होता.

मा.श्री. दिप चव्हाण :- ठराव काय होता.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- २०/१२/२००६ चा ठराव वाचून दाखविला.

मा.श्री. दिप चव्हाण :- तुम्ही ५६ खाली शासनाकडे पाठविले शासनाकडे जे ४५१ खाली जे पाठविले ते वाचा.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- मा. शासनाला सादर केलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.

मा.श्री.दिप चव्हाण :- मा. शासनाला दोन पत्रे सादर केली त्यांची ऑर्डर काय झाली?

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- २०/१२/२००६ चे ठरावावरील निर्णयाचे वाचन केले.

मा.श्री.दिप चव्हाण :-'५६(२) चा निर्णय शासनाने बडतर्फे केले आहे. विखंडीत ठराव कोणता केला. स्थायी समितीने घेतलेला ५६(१) नुसार कामवर घेणेबाबत जो ठराव केला तो ४५१ खाली शासनाला पाठविला. विखंडीत करून तो पुन्हा स्थायी समितीकडे यायला पाहिजे.

ॲक्ट मध्ये बडतर्फीची तरतुद स्थायी समितीला आहे. बडतर्फीचा निर्णय शासनाने दिलेला नाही त्याला पेन्शन ग्रॅज्युएटी दिली का ? त्याची सर्व्हीस किती झाली.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- नेमणूक पद बिगारी नेमणूक तारीख सध्या उपलब्ध नाही.

मा.सभापती साहेब :- जे विषय येतील त्याची संबंधीतानी मधील माहिती देण्यात यावी अन्यथा त्यांच्यावर कारवाई प्रस्तावीत करा.

मा.श्री. दिप चव्हाण :- २००४ ला चौकशी अधिकारी कोण होते त्यांचा रिपोर्ट कुठे वाचला ढाकणे न वसंत थोरात यांचा रिपोर्ट वाचन नाही चार्ज ऑफिसर व चौकशी अधिकारी व आरोपीत कामगार यांचा रिपोर्ट वाचून दाखविला नाही. प्रॉव्हिडंट फंड , ग्रॅज्युएटी ,शिल्लक रजा पगार, पेन्शन देता येईल कि नाही याचा उल्लेख या ठिकाणी नाही. एकदा ठराव झाल्यानंतर कोणत्या कलमाखाली हा विषय घेतला एकदा बडतर्फे ५६(१) प्रमाणे कार्यवाही झाल्यानंतर त्याचे पेन्शन डबल, ग्रॅज्युएटी फंडाची रक्कम इथे पडलेली आहे याच्या देय रकमा गेल्या कुठे तुम्हाला कळत नाही याचा फायदा त्याने घेतला २० तारखेला पगार मस्टर तयार होते. त्याने किरकोळ रजा घेतले वैदयकीय रजा किती घेतली हे त्यावेळेसे नाहीत २० तारखे मस्टर तयार होते. पगार मस्टर मागवले नाही का, त्यावर शेरा याच पाहिजे होता या ठिकाणाहून सुटला व ज्या ठिकाणी हजर झाला नाहीत तसा रिमार्क मस्टरवर यायला पाहिजे होता.

बडतर्फे करून सगळया रकमेचे पत्र का पाठवले नाही त्याचे रकमेचे काय सहा वर्ष आस्थापना कशी झोपले प्रॉ. फंडाची रक्कम ठेवला येत नाही ९ वर्ष रक्कम प्रॉ. फंडाची रक्कम दिली नाही.

मुख्य लेखा परिक्षक श्री. अनारसे :- लगेच रक्कम दयावी लागते.

मा.श्री. दिप चव्हाण :- लेबर कोर्टात कोण गेला

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठाणकर :- कर्मचारी गेला. २०१३ मध्ये गेला

मा.श्री. दिप चव्हाण :- नोटीसची मुद संपली ९० दिवसाची अपीलाची मुदत संपली होती का ?

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठाणकर :- हायकोर्टाने त्यात थोडा दिली होता हायकोर्टाचे निर्णयाचे वाचन केले

मा.श्री. दिप चव्हाण :- अनूसूचीत जातीच्या आयोगाला उत्तर काय दिले.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- त्यांना कळवायचे आहे.

मा.श्री. दिप चव्हाण :- रक्कम देण्यासाठी ज्या समिती मंजुरीची आवश्यकता तरतूद वाचून दाखवा.

आस्थापना प्रमुख श्री. सोनवणे :- मुख्य लेखा परिक्षक व विधी सल्लागार यांचे अभिप्रायानुसार प्रस्ताव सादर केलेला आहे. मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय वाचुन दाखविला.

मा.श्री. दिप चव्हाण :- ५६(१) ड मध्ये काय आहे. उपायुक्त (कर) तरतुद वाचुन दाखविली.

मा. श्री. दिप चव्हण :- वसुल पात्र रक्क्म विषय कशाच्या आधारे स्थायी कडे पाठविता त्याचे पैसे तुमच्याकडे आहेत बडतर्फी संदर्भात त्याला कळविले त्याने घेतले नाही. सचिन जाधव यांनी त्यांचा पत्ता नाही दिला आहे. शासनाने त्याला एकतर्फी बडतर्फे केलेले नाही फक्त ठराव विखंडीत केला.

ॲड. बाबर :- बडतर्फेचा ठराव विखंडीत झाला पूर्वीचा जो स्थायी समितीचा ठराव बडतर्फीचा होता तो ठराव शासनाने विखंडीत करायचा तुमचा ठराव मंजुर झाला एकदा बडतर्फे झाल्यानंतर तुमच्याकडे परत आणायाचा विषय नाही.

मा.उपायुक्त (कर) श्री. बेहेरे :- सुधरित तरतुद वाचन केले.

मा.श्री. दिप चव्हाण :- हायकोर्टाने निर्देश दिलेले आहे. त्याचा संदर्भात कोर्टात जो असे निर्णय होईल तसेच अनूसूचीत आयोगाचा जो निर्णय होत नाही तोपर्यत निर्णय घेण्यात येवू नये.

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठाणकर :- ५६(१) नुसार वसुल करायचे किंवा नाही यासाठी हा प्रस्ताव आहे. स्थायी तील त्याचा निर्णय शासनाने विखंडीत केला तो हायकोर्टात गेला त्याचा निर्णय झालेला आहे. कोर्टाने निर्णय मान्य केला तर रक्कम त्याला परत करता येईल ५६(१) ड वसुल करावयाची रक्कम केली जावी असे प्रशासनाचे येत आहे. नियमनियमावली नुसार कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- तात्पुरत्या विषय स्थगीत ठेवू हायकोर्टाचा निर्णय झाल्यानंतर विषय घेण्यात यावा.

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठाणकर :- अनुसूचीत आयोगाला फक्त अहवाल पाठवायचा आहे टर्मिनेट कर्मचा-या ज्याबाबी देय आहे त्या देणे बंधनकारक आहे. या कर्मचा-या त्या रकमा देय होत असतील त त्या देवून राहू.

मा.श्री. सचिन जाधव :- तो जर नोटीस घेत नसेल तर वर्तमानपत्रात नोटीस देण्यात यावी.

मा.श्री. संपत बारस्कर :- यावर कोर्टात सुरू असलेल्या केस च्या निकालानंतर नियमानुसार निर्णय घ्या.

मा.श्री.सचिन जाधव :- कोर्टातील केसनंतर निर्णय घ्यावा.

मा.सभापती :- संबंधीत कर्मचा-याच्या कोर्टातील केसचा निर्णय झालेला नाही. त्या केसचा निर्णय झाल्यानंतर त्या निर्णयास अनुसरून व नियमांस प्रमाणे या प्रकरणी निर्णय घेणेबाबत प्रस्ताव सादर करावा.

**ठराव :-**ऑफीस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चे नुसार, श्री.वसंत कान्होजी मेघडंबर,पा.पु.बिगारी यांनी मा.औदयोगीक न्यायालयात तक्रार यू.एल.पी.२००/२०१३ दाखल केलेली आहे.परंतू त्या संबंधी अदयापपावेतो कोणताही निर्णय झालेला नाही. त्या केसचा निर्णय झाल्यानंतर त्या निर्णयास अनुसरून व नियमांस अनुसरून या प्रकरणी निर्णय घेणेबाबत प्रस्ताव सादर करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक - मा.श्री. संपत बारस्कर सही /-

अनुमोदक - मा.श्री.सचिन जाधव सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २७ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचा सिध्दीबाग जलतरण तलाव ५(पाच) वर्षासाठी भाडे तत्वावर चालविण्यास देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग

संदर्भ :- १. ई- निविदा क्र.१०२०
२. दिनांक २०/८/२०१५ रोजीची छाननी समितीची बैठक
३. दिनांक २५/०८/२०१५ रोजीची छाननी समितीची बैठक

मा. सादर,

उपरोक्त विषयानुसार विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचा सिध्दीबाग जलतरण तलाव ५ वर्षासाठी भाडे तत्वावर चालविण्यास देणेसाठी ई- निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.

ई- निविदेची आवश्यक प्रक्रिया पार पाडून सदर निविदेस खालीलप्रमाणे दोन निविदा प्राप्त झालेल्या होत्या.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | देय असणारा देकार स्वामित्वधन दरमहा |
|---|---|---|
| १ | मे. कुलकर्णी स्वीम ॲण्ड रिसर्च अकॅडमी | रूपये ५०,०००/- |
| २ | नॅशनल एक्स सर्व्हिसमन सिक्युरिटी गार्ड, अहमदनगर | रूपये ३६,०००/- |

वरील प्रमाणे दरांचा तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता मे. कुलकर्णी स्वीम ॲण्ड रिसर्च अकॅडमी यांचा देकार (स्वामित्व धन) सर्वात जास्तीचा असून मनपाचा आर्थिक फायदा होणेच्या दृष्टीने दर वाढवून मिळणेकामी यशस्वी ठेकेदार एजन्सी मे. कुलकर्णी स्वीम अण्ड रिसर्च अकॅडमी यांना वाटाघाटीसाठी दिनांक २५/८/२०१५ रोजी मा. छाननी समिती समोर बोलविण्यात आले होते. व संबंधीतांशी देकार वाढवून देणेबाबत वाटाघाटी केली असता कुलकर्णी स्वीम अण्ड रिसर्च अकॅडमी यांचे प्रतिनिधी श्री. गणेश कुलकर्णी यांनी भरलेल्या निविदा दरामध्ये वाढ करून रक्कम रूपये ५०,१००/- प्रतिमाह या दराची (स्वामित्व धन) निविदा स्विकृत करण्यात यावी अशी मा.छाननी समितीकडून शिफारस करण्यात आली आहे.

तरी छाननी समितीने शिफारस केलेनुसार मे.कुलकर्णी स्वीम अण्ड रिसर्च अकॅडमी यांचे विषयांकित कामाची निविदा रक्कम रू.५०,१००/- चे दरास मा.स्थायी समितीची मंजूरी करिता प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे सादर करणेस ऑफिस रिपोर्ट सविनय सादर./अ

येणेप्रमाणे शाखा अभियंता यांचा रिपोर्ट असे.

यावर मा.पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मंजुरीस्तव सादर.

यावर मा.मुख्य लेखा परिक्षक यांचा अभिप्राय की, शाखा अभियंता व पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचे शिफारसीनुसार "अ" प्रमाणे कार्यवाही करणेस हरकत नाही.

यावर मा. उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा. आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचा सिध्दीबाग जलतरण तलाव ५(पाच) वर्षासाठी भाडे तत्वावर चालविण्यास देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.उपायुक्त (सा) श्री. चारठाणकर :- आपल्यासमोर रॉयल्टीचा विषय आहे. सर्व रक्कम वसुल मागच्या टेंडर धारककाडून वसुल झाली

मा.सभापती साहेब :- अटी व शर्ती आपल्या सर्व मान्य केल्या का ?

इंजि. श्री. सोनटक्के :- निविदे मधील अटी व शर्ती नुसार फिल्ट्रेशन प्लॅन्ट दुरूस्ती व इतर आवश्यक त्या दुरूस्ती निविदा धारक यांनी करावी असे नमुद केलेले आहे.

मा.श्री.कुमार वाकळे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.सर्व अटी शर्ती मान्य केल्यानंतर त्याला कार्यारंभ आदेश देण्यात यावा.

**ठराव** :-अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीचा सिध्दीबाग येथील जलतरण तलाव ५वर्ष कालावधीसाठी चालविण्यांस देणे व त्या काळात जलतरण तलावाची देखभाल व दुरूस्ती करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता तुलनात्मक दृष्टया जादाचे निविदा दर धारक मे.कुलकर्णी स्वीम अण्ड रिसर्च अकँडमी अहमदनगर यांनी वाटाघाटी अंती वाढवून दिलेल्या दरा नुसार व निविदेतील अटी व शर्ती प्रमाणे रूपये ५०१००/-(रूपये पन्नास हजरा शंभर फक्त) प्रमाणे दरमहा भाडे व पुढील वर्षापासून प्रति वर्षी १०% (दहा टक्के) दरमहा भाडयात वाढ या प्रमाणे जादाचे दरास तसेच अस्तित्वातील जलशुध्दीकरण यंत्र व जलतरण तलावाच्या आवश्यक त्या दुरूस्त्या निविदाधारक यांनी स्वखर्चाने करावयाच्या आहे.जलतरण तलाव भाडेतवावर चालविणेस देणेस ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर

तसेच नामंजूर निविदा दर धारक यांची टेंडर बयाना रिफंड करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०२**

विषय क्रमांक- २८ बुधवार दिनांक- १४/१०/२०१५

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जानुसार ॲड.श्री. धैर्यशील लक्ष्मण वाडेकर , पॅनलशिपवरील कायदेशिर सल्लगार (मानद विधी तज्ञ) यांचा राजीनामा मंजुर करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

विनंती रिपोर्ट की, ॲड. धैर्यशील लक्ष्मण बाडेकर यांची जा.क्र.आस्था. ३०७४ दिनांक ३०/७/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेतील दाबे संदर्भात कामकाज पहाणेसाठी पॅनलशिपवर कायदेशीर सल्लागार म्हणून दरमहा रू.१००००/- मानधनावर दिनांक १/८/२०१४ पासून पुढील आदेश होईपर्यत नेमणूक करण्यात आलेली आहे.

ॲड. धैर्यशील लक्ष्मण बाडेकर यांनी दिनांक ८/९/२०१५ रोजी अर्ज देवुन " माझी नेमणूक आपल्या महानगरपालिकेच्या विधि शाखेच्या वकीलांच्या पॅनलवर वकील म्हणून झालेली आहे. मी वकील या नात्याने आपल्या महापालिकेचे प्रामाणिकपणे काम केलेले आहे. परंतू माझ्या वैयक्तीक कारणास्तव यापुढे महापालिकेचे काम पहाणे शक्य होणार नाही. तरी मी माझे पॅनलवरील वकीलीचा राजीनामा देत आहे." असे नमुद केलेले आहे.

तरी ॲड. धैर्यशील लक्ष्मण बाडेकर यांनी दिनांक८/९/२०१५ रोजी देवुन त्यांना वैयक्तीक कारणास्तव मनपाचे न्यायालयीन कामकाज पहाता येणार नसल्या बाबतचे कारण नमुद केलेले असल्याने त्यांचे सदर अर्जानुसार त्यांचा दिनांक८/९/२०१५पासून राजीनामा मंजूर करून त्यांचेकडील मनपाचे दस्तऐवज (कागदपत्रे) मनपा कामगार विभागाकडे सादर करणे बाबत त्यांना कळविणे उचित वाटते. तथापी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा रिपोर्ट असे.

यावर प्र. सहा.आयुक्त यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा सहमती दर्शक सही

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, (१) दिनांक ३०/७/२०१४ रोजी पत्रान्वये आस्थापना विभागाकडून नियुक्ती केली आहे., (२) सदरची नियुक्ती मा.स्थायी समिती ठराव क्र.४४ दिनांक ८/७/२०१४ रोजी मान्यतेने केली असे दिसते., (३) राजीनामा मान्यतेसाठी मा.स्थायी समिती सभेस प्रस्ताव आस्थापना विभागामार्फत सादर करणेत यावा.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

---****---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जानुसार ॲड.श्री. धैर्यशील लक्ष्मण वाडेकर , पॅनलशिपवरील कायदेशिर सल्लगार (मानद विधी तज्ञ) यांचा राजीनामा मंजुर करणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. संपत बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यांत आला.

मा.श्री. कुमार वाकळे :- राजीनामा नामंजुर परत त्यांना काम देण्यांत यावे.

मा-श्री. संपत बारस्कर :- राजीनामा नामंजुर परत त्यांना काम देण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- न्यायालयीन प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करणेकामी आवश्यक्ता असल्याने राजीनामा नामंजूर करण्यात यावा.

**ठराव :-** अर्जानुसार ॲड.श्री. धैर्यशील लक्ष्मण वाडेकर , पॅनलशिपवरील कायदेशिर सल्लगार (मानद विधी तज्ञ) यांनी राजीनामा दिला.परंतू म.न.पा.ची न्यायालयीन प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करणेकामी आवश्यक्ता असल्याने त्यांचा राजीनामा नामंजूर करण्यांत येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. कुमार वाकळे सही /-

अनुमोदक :- मा-श्री. संपत बारस्कर सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका